सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०८ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२७ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com






# श्री दत्त शिखर गडावरुन आज निघणार परीक्रमा वेढा

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. ७ ऑगस्ट -**

श्री दत्तात्रेय संस्थान दत्त शिखर,माहूरगड येथे श्री श्री श्री प. पु. १००८ महंत मधुसूदन भारती महाराज यांच्या कृपाशीर्वादाच्या मार्गदर्शनाखाली ०३ ते १० ऑगस्ट या कालावधीत नारळी पौर्णिमेनिमित्त परिक्रमा वेढा यात्रोत्सव साजरा केला जात आहे. तर, या यात्रेचे विशेष धार्मिक आकर्षण असलेला पंचक्रोशी परिक्रमा वेढा आज शुक्रवारी ०८ ऑगस्ट रोजी निघणार असून, ०९ रोजी रक्षाबंधन हा सण साजरा करण्यात येणार आहे. लाखोंच्या संख्येने यात्रेत सहभागी होण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी संस्थानच्यावतीने पुरेपूर सुलभ दर्शन व्यवस्था करण्यात आली असून, आज निघणाऱ्या परिक्रमा वेढ्यात सहभागी होण्यासाठी भाविकांनी दुपारी ०३ वाजेपर्यंत उपस्थित राहावे,असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

या यात्रोत्सवातील अखंड दत्तनाम सप्ताहास दिनांक ०३ ऑगस्ट रविवार श्रावण शुक्लपक्ष नवमी १० सकाळी ६:०० वाजता पासून सुरुवात झाली असून,सप्ताह समाप्ती दि.१० रोजी होणार आहे. नारळी पौर्णिमा (रक्षाबंधन) परिक्रमा पंचकोशी वेढा यात्रा आज दिनांक ०८ रोज शुक्रवार दुपारी ०४ वाजता श्री दत्तात्रेय संस्थान शिखर माहूरगड येथून निघणार असून, दुसऱ्या दिवशी उद्या शनिवारी दिनांक ०९ रोजी परत येणार आहे.ज्या भाविकांना परिक्रमेला यायचे असेल त्यांनी दत्तशिखर येथे दुपारी ०३ वाजता हजर राहावे, असे आवाहन संस्थानकडून करण्यात आले असून,श्रावण कृष्णपक्ष प्रतिपदा काकडा आरतीने या अखंड दत्त नाम सप्ताहाची १० रोजी सकाळी ०६ वाजता (सूर्योदय) समाप्ती होणार आहे.

**परिक्रमा वेढा मार्ग**

सर्वप्रथम सर्वतिर्थ येथून स्नान करून श्री दतात्रेय शिखर येथील दत्त प्रभुचे



दर्शन घेऊन त्या ठिकाणावरून परिक्रमेला पुढीलप्रमाणे सुरुवात होईल.कमंडलू कुंड-काळेपाणी,काळेश्वर महादेव,अनमाळ महादेव,सयामाता,गरुडगंगामोवाळ तळं,विष्णूकवी मठ (विश्रांती),झंपटनाथ कालभैरव,माहूर मारुती मंदिर, कपिलेश्वर मंदिर,स ोनापीर,कवठापीर,पांडवलेणी, भिमतिर्थ, आनंद मठ पुरुषोत्तम भारती चंचल भारती (चहापाणी करीता),बद्रिका आश्रम (देवदेवेश्वरीच्या खालील जुना वझरा रस्ता),महादेव कैलास टेकडी (जुना कैलास पायथा),शेख फरीद, वझरा मारोती,ग्रामदेवता (दत्तमांजरी वाडा), अत्रीऋषी कुंड,अनुसया माता,सर्वतिर्थ आणि दत्तशिखर येथे परत अशाप्रकारे परिक्रमेची समाप्ती होणार आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत भाविकांनी शांततेत प्रभु श्री दत्तात्रेय स्वामींच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, तसेच परिक्रमा वेढ्यात सहभागी होण्यासाठी वेळेआधीच गडावर उपस्थित राहावे व मंदिर संस्थानला सहकार्य करावे,असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

**नगरपंचायत प्रशासनाकडून जय्यत तयारीनिशी चोख नियोजन**

परीक्रमा वेढा यात्रा आढावा बैठकीत सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,

किनवट यांनी दिलेल्या निर्देशानुसार नगर पंचायत माहूर कडून नगराध्यक्ष फिरोज दोसानी, मुख्याधिकारी विवेक कांदे आणि कार्यालयीन अधीक्षक देविदास गजलवार यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांना विविध स्वरूपाची कामें सोपविण्यात आली आहेत.

त्यात नियंत्रण कक्ष, यात्रा नियंत्रण फिरते पथक, पार्किंग व्यवस्था करणे, पाणी पुरवठा,विद्युत व्यवस्था, स्वच्छता, अग्निशमन, मोकाट जनावरे व कुत्रे पकडणे व्यवस्था, रस्त्यावरील राडा रोडा यासह दैनंदिन कार्यालयीन कामें अशाप्रकारे ७,६,१०,५,४,८,३ व ५ अशा कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या प्रमाणात एकूण ८ पथकं नेमण्यात आली असून,प्रत्येक पथकास एक पथक प्रमुख नेमून देत कामें करुन घेण्याची त्याच्यावर स्वतंत्र जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यात्रा नियोजन व्यवस्थेबाबत नगराध्यक्ष फिरोज दोसानी मुख्याधिकारी विवेक कांदे आणि कार्यालयीन अधीक्षक देविदास गजलवार हे प्रत्यक्ष ग्राऊंडवर उपस्थित राहून परीस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### स्मशान भूमिसाठी तहसीलदारांना निवेदन

**निवघा**-हदगाव तालुक्यातील निवघा बाजार येथील गोपाळ समाजाच्या स्मशानभूमीची नोंद ग्रामपंचायत च्या शासकीय दस्तऐवजात नसल्याने, अंत्यसंस्कारविधीची समस्या निर्माण होत आहे. कायमस्वरूपी नोंद घेण्यात यावी म्हणून, गोपाळ समाज बांधवांच्या वतीने तहसीलदार सुरेखा नांदे, यांना दिलेल्य निवेदनाद्वारे द्वारे मागणी केली आहे. पूर्वी ग्रामीण भागात एकत्र कुटुंब पद्धतीला अग्रक्रम असल्याने, खेडो -पाडी मोकळ्या जागा मोठ्या प्रमाणात असत. थोडेफार समाज गावात राहत असल्याने, प्रत्येक समाजाची वेगळी स्मशानभूमी असावी ही प्रथा प्रचलित होती. निवघा बाजार येथेही गोपाळ समाजाची खूप मोठी वस्ती असून जवळपास साठ वर्षां पासून त्यांची स्वतंत्र समशानभूमी आहे. सभोताल बांधलेली थडगे त्याची साक्षी आहेत. असे असूनही, या स्मशानभूमीची ग्रामपंचायत च्या शासकीय दस्ताऐवजाला अद्याप नोंदच नसल्याने, भविष्यात, स्मशान भूमीसाठी अडथळे निर्माण होऊ नये म्हणून, ही नोंद गाव नमुना आठ ला असायला हवी म्हणून, या गावच्या समाज बांधवांच्या वतीने, ग्रामपंचायत चा ठराव घेण्यात आला. सदर स्मशानभूमीची कायम नोंद व्हावी म्हणून समाज बांधवांच्या वतीने, तहसीलदार सुरेखा नांदे यांना ग्रामपंचायत च्या दिलेल्या ठरावाद्वारे मागणी केली आहे. यावेळी पत्रकार अशोक गव्हाणे विजय गव्हाणे, शंकर धनगर, अमोल धनगर, पत्रकार देवानंद महाजन, बंडू महाजन, शिवाजी धोंगडे, संतोष धनगर, राहुल नवघरे आदी समाज बांधवांची उपस्थिती होती.

### आनंद देऊळगावकर यांना उत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार प्रदान

**मुदखेड** -महसूल दिनानिमित्त प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उपविभागीय अधिकारी भोकर प्रवीण मेंगशेट्टी यांना उत्कृष्ट उपविभागीय अधिकारी व मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना उत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार दि.६ ऑगस्ट रोजी नांदेड येथील एका विशेष समारंभात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे हस्ते शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात प्रदान करण्यात आला. मुदखेडचे तहसीलदार म्हणून आनंद देऊळगावकर यांनी उमरखेड येथून दि.७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुदखेड येथे पदभार स्वीकारला त्यांच्या काळात विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे नागरिकांच्या समस्यांचे जलद निराकरण करणे सोबतच शासकीय कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण प्रयत्न केले त्यांनी मुदखेड तालुक्यात शासनाच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत सातबारा वरील नावात दुरुस्तीसाठी विशेष मोहीम हाती घेतली होती या अंतर्गत मुदखेड तालुक्यातील जवळपास ६५० च्या वर सातबारा वरील नावात दुरुस्ती करून सर्व गावांचे रेकॉर्ड अपडेट करून गावांचे D4 डिक्लेरेशन करण्यात आले ई कार्यालयातून फाईल जनरेट करुन त्याद्वारेच कामकाज करण्यात सर्वाधिक फाईल या नांदेड जिल्ह्यातून सर्वात जास्त होत्या असे करणारा मुदखेड तालुका हा नांदेड जिल्ह्यातून १६ तालुक्यांतून पहिला ठरला असल्यामुळे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी व मुदखेड तहसीलदार आनंद देऊळगावकर यांचे नाव उत्कृष्ट तहसीलदार म्हणून पुरस्कारासाठी जाहीर करण्यात आले व नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात विशेष कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी व मुदखेड येथील तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना हा पुरस्कार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पि एस बोरगांवकर, अनन्या रेड्डी,मेघना कावली,किरण अंबेकर महेशकुमार डोईफोडे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### उमरीत हुतात्मा दत्तात्रेय उत्तरवार सभागृहाचे आ.राजेश पवार यांच्या हस्ते लोकार्पण

**उमरी** - उमरी भागातील क्रांतिकारकांनी निजामी राजवटी विरुद्ध मोठा संघर्ष केला , स्वतंत्रसंग्रामातील त्यांचे योगदान , त्यांचा इतिहास कायम स्मरणात राहावा म्हणून आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन आमदार राजेश पवार यांनी केले आहे .उमरी येथील तहसील आवारामध्ये हुतात्मा दत्तात्रेय देविदासराव उत्तरवार यांचे नाव देऊन या सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी माजी निर्भीड जि. प. सदस्या पूनमताई पवार, उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे, गटविकास अधिकारी व्ही.आर.आरबडवाड, तहसीलदार मंजुषा भगत, न.प. मुख्याधिकारी गणेश चाटे, नायब तहसीलदार संजय सोलनकर, पोलीस निरीक्षक अंकुश माने, सा.बां.चे उप अभियंता गायकवाड, जुगल जाधव, महावितरणचे उपअभियंता एस. व्ही. जगदाळे, स्वातंत्र्य सेनानी जानकाबाई माने, सुंदरबाई क्षिरसागर, सरस्वतीबाई गळगे, श्यामाबाई सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती. मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात संपूर्ण देशात ऐतिहासिक ठरलेल्या उमरी बँक ऑपरेशनचा इतिहास भावी पिढीला समजावा. त्यापासून राष्ट्रभक्ती व देशावरील निष्ठा कायम राहण्याच्या दृष्टीने प्रेरणा मिळावी. यासाठी उमरी येथे सुसज्ज असे डिजिटल स्मारक उभारण्याचा मनोदय आमदार पवार यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारस मोहन उत्तरवार, सुभाष पेरेवार, अशोकराव संगेवार, योगेश शर्मा, प्रकाश पुणेबोईनवाड यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शासकीय गुत्तेदार संजीव विठ्ठलराव सवई , उदोजक बापूसाहेब कौडगावकर, पारसमल दरडा, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, डॉ. विक्रम देशमुख , ज्ञानेश्वर सावंत , सुभाष पेरेवार ,प्रभाकर पुयड नगरसेवक प्र सोनू वाघमारे व तालुक्यातील सरपंच उपसरपंच चेअरमन प्रतिष्टीक व्यापारी पत्रकार मोठया संख्यने उपस्थित होते .

# कर बुडविण्यात हदगावातील व्यापारी अव्वल

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ७ ऑगस्ट -**

शहरासह तालुक्यातील नामवंत अल्पवधीत कोट्यावधी रुपयांची उलाढाल करणारे व्यापारी ग्राहकांना पक्के बिल न देता जनतेची आर्थिक लूट करून आपलेच हित साधण्यात धन्यता मानत आहेत. यामुळे मात्र कर स्वरूपी शासनाच्या तिजोरीत जाणारा पैसा स्वतःच्या घशात घालत असुन संबंधित विभागाने हदगाव शहरासह तालुक्यातील अशा व्यापाऱ्यांचा शोध घेऊन यांच्या पूर्ण मालमत्तेची चौकशी करून यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

हदगाव तालुक्यात तामसा, मनाठा, निवघासह शहरात मोठी बाजारपेठ आहे. येथे कापड दुकाने, सोने-चांदीचे दुकाने, भुसार व्यापारी , कृषी बी - बियाणे व घर बांधकाम साठी लागणारे साहित्य यांच्यासह इतर व्यापारी होलसेल व किरकोळ ग्राहकांना कोणत्याही प्रकारचे पक्के बिल देत नसल्याचे निदर्शनास येत आहे. लग्न सराई असो अथवा कोणत्याही सणाचे दिवस असो यामुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात ग्राहकांची गर्दी होत असते. याचाच फायदा घेत हे ग्राहकांना कच्चे बिल देऊन आपले हित साध्य करत आहेत. या सर्व व्यापारी कडे मोठ्या प्रमाणात काळा पैसा जमा झाला असावा अशीही शक्यता वर्तवण्यात येत आहे. याची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागाने अशा व्यापाऱ्यांची दोन वर्षा अगोदरची आर्थिक व्यवहार व आताचे आर्थिक व्यवहारची व यांच्या मालमत्तेची पूर्ण चौकशी करून यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# मुदखेड ग्रामीण रुग्णालयाचा कारभार रामभरोसे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ७ ऑगस्ट -**

मुदखेड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी साठी कर्तव्यावर असलेले प्रशिक्षणार्थी वैद्यकीय कर्मचारी अरे रवीची भाषा वापरत असून रुग्णांना दुय्यम वागणूक मिळत असल्याने रुग्णालयाचा कारभार राम भरोसे झाला आहे



तालुक्यातील गोरगरीब रुग्णांना २४ तास तातडीची उपचार सेवा मिळावी या उद्देशाने शासनाने ग्रामीण रुग्णालय उभारले आहे परंतु या ठिकाणचे अधिकारी व कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणी वास्तव्यास असल्याने उंटावर बसून शेळ्या राखण्यासारखा रुग्णालयाचा कारभार आहे ग्रामीण रुग्णालय अंत कर्मचाऱ्यावर शासन लाखो रुपये खर्च करत आहे अधिकारी व कर्मचारी मर्जीनुसार वैद्यकीय सेवेचा कारभार चालवत असल्याने रुग्णांना वैद्यकीय सेवा तातडीची तर सोडाच बाहेर रुग्णसेवा मिळत नाही अधिकारी व कर्मचारी रेल्वेच्या वेळेनुसार ग्रामीण रुग्णालय आहे. यामुळे ग्रामीण रुग्णालयाचा कारभार रामभरोसे झाला आहे. ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरूपी कर्तव्यावर असलेले अधिकारी व कर्मचारी रुग्णांच्या वैद्यकीय तपासण्याची जबाबदारी प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यावर सोपवून मोकाट फिरत आहेत यामुळे रुग्णालयात तपासणीसाठी आलेले रुग्णांना अरे रवीची भाषा वापरत आहेत यामुळे रुग्णांना दर्जेदार रुग्णसेवा मिळत नसून दुय्यम वागणूक मिळत आहे एकीकडे केंद्र व राज्य शासन गोरगरीब रुग्णांसाठी मोठ मोठ्या योजना राबवून गाजावाजा करत आहे परंतु यास मुदखेड चे ग्रामीण रुग्णालय अपवाद असल्याचे दिसून येत आहे

# पोलीस ठाण्यासमोर पुन्हा अतिक्रमणाच्या हालचाली ; तामसा पोलीस गप्प ?

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. ७ ऑगस्ट -**

तामसा - तामसा शहरात अतिक्रमणाच्या कारणावरून काही महिन्यापूर्वी दोन वेळा, दोन गटात वाद, हाणामारी, गुन्हे दाखल होण्याच्या घटना घडल्या होत्या. तणावपूर्ण वातावरण निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. कळीचा मुद्दा ठरलेले शहरातील बेकायदेशीर अतिक्रमण वरिष्ठ पोलीस व महसूल प्रशासनाने पुढाकार घेऊन काढले होते. परंतु सध्या पोलिसांच्याच दुर्लक्षाने पोलीस ठाण्यासमोर पुन्हा अतिक्रमणाच्या हालचाली वाढल्या असून अतिक्रमणे पाय रोऊ लागल्याने तामसा पोलीस प्रशासन अतिक्रमणांबाबत आता गप्प का? असा प्रश्न सामान्य नागरिकांतून विचारल्या जात आहे.

तामसा येथील राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील वाढत्या अतिक्रमणाच्या कारणावरून दोन वेळा दोन गटात झालेल्या हाणामारीच्या घटनांनी शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडली होती. दोन गटाच्या शंभर दिडशे तरुणांवर परस्पर गुन्हे दाखल झाले होते. काही दिवस अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागला होता. शहरातील शांतता भंग होणे, तणाव निर्माण होणे, दहशत निर्माण करणाऱ्या भांडणाचा कळीचा मुद्दा अतिक्रमणच असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या लक्षात आल्याने त्यांनी थेट रस्ते प्राधिकरणाला सूचना करून शहरातील बेकायदेशीर अतिक्रमण वरिष्ठ पोलीस व महसूल प्रशासनाच्या पुढाकारातून काढले होते. अर्धवटच का होईना, पण अतिक्रमणे काढल्याने शहरात शांतता प्रस्थापित झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लावलेले बॅनर फाडल्याच्या कारणावरून दोन गटात हाणामारी होऊन तणाव वाढला होता. तहसीलदार सुरेखा नांदे, तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांनी देखील अतिक्रमण काढली होती. बौद्ध विहारासमोरील वादग्रस्त अतिक्रमणे काढल्याने कायमचा वाद मिटला. परंतु सध्या पोलीस ठाण्याच्या गेटजवळील निष्कासित केलेले अतिक्रमणं पुन्हा पाय रोऊ लागले आहेत. जुने बसस्थानक चौकात, रस्त्याच्या डिवायडरच्या जागेत बेशिस्त वाहने, फळ विक्रेत्यांचे गाडे, भाजीपाल्यांचे गाडे उभे करून वाहतुकीची कोंडी होताना दिसते. तेंव्हा पोलीस प्रशासन आता गप्प का? त१ामसा पोलिसांना शहरात अतिक्रमणाचा वाद पुन्हा निर्माण करायचा का? असा प्रश्न जाणकारांतून विचारला जात आहे.

# तरुणांनी तुळशी माला धारण करून निर्व्यसनी व्हावे : ह. भ. प. नारायण महाराज

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ७ ऑगस्ट -**

श्रावण मास पुत्रदा एकादशी पर्वकाळ निमित्त तुळशी मला धारण कार्यक्रम व भव्य किर्तन सोहळ्याचे आयोजन मौजे मांडवा तालुका किनवट येथे दिनांक ५ ऑगस्ट रोज मंगळवारी करण्यात आले. मागील दोन वर्षापासून व्यसनमुक्ती वर आधारित तुळशी मला धारण कार्यक्रम आयोजित करण्यात येतो याही वर्षी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी आदरणीय श्री नारायण महाराज यांनी तरुणांना आवाहन केले की, आता हाची संदेश आहे की आपल्या आयुष्याचा नाश न करता निर्व्यसनी जीवन जगून उर्वरित आयुष्य ईश्वरीय कार्यात सामाजिक कार्यात खर्च करावे व आपला उपयोग कुटुंबासाठी समाजासाठी व देशासाठी करावा. संसारामध्ये व्यसन आणि परमार्थामध्ये विषय हे मनुष्य जीवनात माणसाला अधोगतीकडे घेऊन जातात. संसार आणि परमार्थ दोन्हीची सांगड घालण्यासाठी व व्यसनाधीन होऊन उपेक्षित जीवन जगण्यापेक्षा पवित्र तुळशी माला धारण करून एक आदर्श नागरिक व्हावे असा संदेश महाराजांनी तरुणांना व व्यसनात गुरुफटलेल्या नागरिकांना आपल्या किर्तनातून दिला.

# ईस्लापूर आरोग्य केंद्रात जागतिक स्तनपान सप्ताह कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ७ ऑगस्ट -**

तालुक्यातील ईस्लापूर येथे जिल्हा परिषद नांदेडच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कालवी यांच्या संकल्पनेतून जागतिक स्तनपान सप्ताह चालू असून आज रोजी इस्लापूर आरोग्य केंद्रात स्तनपान सप्ताह निमित्त ' हिरकणी माता पुरस्कार ,बाळकृष्ण बालक पुरस्कार ,गरोदर माता पुरस्कार , असे पुरस्कार देऊन महिलांना सन्मानित करण्यात आले . तसेच कार्यक्रमात आरोग्य कर्मचारी महिलांनी स्तनपान विषया छोटीशी नाटिका सादर करण्यात आली होती .



आज दिनांक ७ रोजी ईस्लापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्तनपान सप्ताह निमित्त कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष त्यांनी जेष्ठ नागरिक नारायण दंतलवाड, हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका आरोग्य अधिकारी किशन गायकवाड, वनपाल सोनाळे मॅडम , वनरक्षक सय्यद अकबर , वनपाल कोलते ,बी .बी धोत्रे, कुडमुते मॅडम केंद्रे मॅडम नागरगोजे,परमेश्वर पेशवे गौतम कांबळे प्रमोद जाधव हे होते .त्यावेळी स्तनपान विषयी ताई नामेकर ,सुकेशनी काकडे ' महानंदा गोपनवाड संगीता झंपलवाड , रंजना कीर्तन , यांनी नाटिका सादर केली तसेच हिरकणी माता पुरस्कार वैशाली धनेश राठोड , बाळकृष्ण बालक पुरस्कार तन्मय पूजा बालाजी सोळंके, प्रोत्साहन बक्षीस श्रीहरी रमेश पाशमवाड आई माता ' यांना मिळाले कार्यक्रमात तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांना व महिलांना सखोल माहिती दिली .त्यावेळी वैद्यकीय अधिकारी ऋषिकेश निकम डॉ प्रदीप शिंदे ,डॉ जानसेवाड, आरोग्य कर्मचारी अंगणवाडी सेविका आरोग्य सेविका आदि महिला कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ .भारती यांनी केले.

# लोहा व कंधार येथे मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शासकीय वसतीगृहास मंजुरी

**तभा वृतसेवा**
**लोहा/कंधार, दि. ७ ऑगस्ट -**

लोहा व कंधार तालुक्यातील मागासवर्गीय गोरगरीब मागासवर्गीय मुला- मुलींच्या इयता पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची शिक्षण तसेच निवास व भोजनाची सोय या वसतिगृहात होणार असून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शासकीय वसतिगृह मंजुरी पत्र पाठविले आहे

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालण्याची भूमिका असते. त्यामुळे निवडणूक काळात कितीही जातीवाद झाला तरीही त्यांना लोकप्रियतेवर कोणताही परिणाम झाला नाही लोहा व कंधार तालुक्यातील मागासवर्गीय मुला-,मुलींच्या इयता पाचवी ते बारावी पर्यंत तालुक्याच्या ठिकाणी शिक्षणासाठी राहण्याची व भोजनाची ची सोय व्हावी यासाठी शासकीय वसतिगृह व्हावे यासाठी आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पाठपुरावा केला

राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी या दोन्ही तालुक्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून शासकीय वसतिगृह मंजूर केले तसे पत्र सामाजिक न्याय मंत्री यांनी आमदार प्रतापराव पाटील यांना पाठविले आहे



लोहा येथे पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना याबाबत पत्र दाखविले त्याचे जाहीर वाचन करण्यात आले.माजी नगराध्यक्ष कल्याणराव सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, छत्रपती धुतमल , दता वाले, करीम शेख सेवानिवृत्त डीवायएसपी सोपानराव मोरे, , राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष भोसीकर

भास्कर पवार ,पंचशील कांबळे, बालाजी खिल्लारे, अप्पाराव पवार, बी डी जाधव ,अभंग पाटील, माधव पाटील बोरगावकर , राम पाटील दिपक पाटील कानवटे यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते

सामाजिक न्यायमंत्री यांनी पत्राद्वारे आपल्या तालुक्यातील ग्रामीण भागातून शिक्षणासाठी घेणाऱ्या मागासवर्गीय मुले व मुलींना कंधार व लोहा येथे नविन शासकीय वसतिगृह स्थापनेची मागणी केली होती. सदर मागणीचे मागील उद्दिष्ट अत्यंत महत्त्वाचे आहे आपल्या तालुक्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असून, त्यांना शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी सोय व्हावी , निवास व भोजनाच्या सुविधे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात, अशा परिस्थितीत शासकीय वसतिगृह उपलब्ध झाल्यास त्यांना सुरक्षित निवास, पोषणयुक्त भोजन, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण आणि शैक्षणिक साहित्य यांची सुविधा मिळू शकते.कंधार व लोहा येथे नविन शासकीय वसतिगृहास मंजूरी देण्यात येत आहे असे पत्र आमदार चिखलीकर यांना पाठवण्यात आले आहे यामुळे येत्या काळात हे वसतिगृह पूर्णत्वास गेल्यावर अनेक विद्यार्थ्यांना याचा शैक्षणिक फायदा होणार आहे

# श्री क्षेत्र उमरज येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. ७ ऑगस्ट -**

श्रीक्षेत्र उमरज (धाकटे पंढरपूर) ता.कंधार येथे श्री संत सदगुरू नामदेव महाराज जन्मोत्सव, श्रीकृष्ण जन्मोत्सव व श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त शनिवार, दि.९ ऑगस्ट ते शनिवार, १६ ऑगस्ट दरम्यान, अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

दररोज पहाटे ४ ते ६ दरम्यान काकडा भजन, सकाळी ७ ते ९ श्री संत नामदेव महाराज ग्रंथ परायण, सकाळी १० ते दुपारी १२ गाथा भजन, दुपारी १२ ते ३ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ हरिकीर्तन व हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. यावेळी भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प.कृष्णा महाराज धानोरकर हे राहणार आहेत.





यावेळी शनिवार, दि.९ ऑगस्ट रोजी ह.भ.प.कृष्णा महाराज धानोरकर, रविवार, दि.१० ऑगस्ट रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज करंजीकर, सोमवार, दि.११ ऑगस्ट रोजी ह.भ.प.सोपान महाराज सानप हिंगोलीकर, मंगळवार, दि.१२ ऑगस्ट रोजी ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणेकर, बुधवार, दि.१३ ऑगस्ट रोजी ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज बावस्कर, गुरुवार, दि.१४ ऑगस्ट रोजी ह.भ.प.कृष्णा महाराज चवरे, शुक्रवार, दि.१५ ऑगस्ट रोजी ह.भ.प.कृष्णा महाराज नवले पैठणकर, मुक्ताईनगर आदी कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. तर शनिवारी, दि.१६ ऑगस्ट रोजी श्री संत, महंत, मठाधिपती एकनाथ महाराज उमरजकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

या विविध धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत नामदेव महाराज संस्थानचे मठाधिपती श्री संत, महंत एकनाथ महाराज उमरजकर यांनी केले आहे.

यावेळी विविध गावातील गायनाचार्य, मृदंगाचार्य व भजनी मंडळी उपस्थित राहणार आहे. हरिपाठाचे नेतृत्व श्री संत नामदेव महाराज वारकरी संस्था, उमरज करणार आहे.

शुक्रवार, दि.१५ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते ११ वाजता श्री ओम नमो नामदेवाय नम या महामंत्राचा सव्वा लाख नाम जप होणार आहे. रात्री १० ते १२ दरम्यान श्री गुरु नामदेव महाराज यांच्या समाधीचा महाअभिषेक व फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येणार आहे. शनिवार, दि.१६ ऑगस्ट रोजी या सप्ताहाची सांगता महाप्रसादाने होणार आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०८ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२७ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ओबीसीसाठीचा लढा थांबणार नाही! देवेंद्र फडणवीस

गोवा : गोव्यात सुरू असलेल्या ओबीसी महासंघाच्या अधिवेशनात आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली. या वेळी बोलताना त्यांनी ओबीसी समाजाच्या प्रगतीसाठी आपल्या सरकारच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. फडणवीस म्हणाले, ओबीसी महासंघाची सुरुवात २००५ मध्ये एका छोट्याशा खोलीतून झाली होती, पण आज तो एक प्रभावशाली मंच बनला आहे. माझा सातत्याने या संघटनेशी संपर्क राहिला असून, या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

परदेशी शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांना संधी

तसेच, त्यांनी पुढे नमूद केलं की, आपल्या ओबीसी विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणाच्या संधी खुल्या केल्या असून, अनेक विद्यार्थी याचा लाभ घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर शिकत आहेत. येत्या काळात या समाजासाठी आणखी चांगले निर्णय घेतले जातील. फडणवीसांच्या या विधानांमुळे अधिवेशनात नवचैतन्य निर्माण झालं असून, ओबीसी समाजातील अनेकांनी याचे स्वागत केले आहे.

मला टार्गेट करण्यात आलं : मुख्यमंत्री फडणवीस

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी आहेत. आपल्या राष्ट्रीयस्तरावर ओबीसींचा बोलबाला झाल्याचे आपल्याला बघायला मिळाले. हेच नाही तर स्वातंत्र्य काळानंतर सर्वात जास्त ओबीसींना मंत्रिमंडळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थान दिले. माझ्यावर ओबीसी समाजाबद्दल बोलल्याबद्दल माझ्यावर टीका झाली. मला टार्गेट करण्यात आलं. मला कितीही टार्गेट केलं तरीही मी ओबीसी समाजाच्या हक्कासाठी लढणार आहे आणि माझी लढाई चालूच राहणार आहे.

'ओबीसी समाजासाठी माझी लढाई थांबणार नाही'



माझ्यावर कितीही टीका झाली, तरीही मी ओबीसी समाजाच्या हक्कासाठी लढत राहणार आहे. फडणवीस म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः ओबीसी समाजातून येतात. स्वातंत्र्यानंतर प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात ओबीसी नेत्यांना केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळात स्थान मिळालं आहे, आणि याचं श्रेय पंतप्रधान मोदींनाच जातं. तसेच त्यांनी आपल्यावर झालेल्या टीकेचाही उल्लेख केला. ओबीसी समाजासाठी बोलल्यामुळे माझ्यावर टीका झाली, मला टार्गेट करण्यात आलं. पण मी न घाबरता लढत राहणार आहे. ओबीसी समाजाला न्याय मिळेपर्यंत ही लढाई थांबणार नाही, असं ठाम मत मुख्यमंत्री फडणवीसांनी मांडलं. फडणवीसांच्या या वक्तव्यामुळे अधिवेशनात उपस्थित ओबीसी प्रतिनिधींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ओबीसी समाजासाठी लढतोय म्हणजे इतरांचा विरोध करतोय, हे चुकीचं चित्र!

मी आज मुख्यमंत्री आहे, हे ओबीसी समाजासह सर्व समाजाच्या आशीर्वादामुळेच शक्य झालं आहे. एखाद्या समाजासाठी लढतो म्हणजे इतर समाजाच्या विरोधात आहोत, असं दाखवणं पूर्णपणे चुकीचं आहे. फडणवीस यांनी सरकारने ओबीसी समाजासाठी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची यावेळी आठवण करून दिली. आम्ही ओबीसींसाठी ५० महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यांना त्यांचं आरक्षण पुन्हा मिळवून दिलं. काही लोकांनी याविरोधात कोर्टात धाव घेतली होती, पण कोर्टानेदेखील निर्णय ओबीसी समाजाच्या बाजूने दिला आणि त्यांना पुन्हा २७ टक्के हक्काचं आरक्षण मिळालं, असं फडणवीस यांनी ठामपणे सांगितलं.

ओबीसी समाजासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही

समाजाचं कार्य आणि सहभाग महत्त्वाचा आहे, कारण त्यातूनच समाजाचं खऱ्या अर्थाने कल्याण होतं. आम्ही ओबीसी समाजासाठी कुठेही निधीची कमतरता जाणवू देणार नाही. फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केलं की, जर गरज भासली, तर अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाईल. यासोबतच त्यांनी महाराष्ट्रासह गोव्यातही ओबीसी समाजाच्या हितासाठी ठोस निर्णय घेतले जातील, असा विश्वास व्यक्त केला. अधिवेशनात विविध विषयांवर फडणवीसांनी आपली मते मांडली असून, त्यांच्या भाषणातून सरकारचा ओबीसी समाजाविषयी असलेला सकारात्मक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून आला.

## सीआरपीएफचे वाहन खोल दरीत कोसळले, दोन जवानांचा दुर्दैवी मृत्यू, १२ जखमी

जम्मू-काश्मीर : जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात बसंतगड परिसरात एक मोठा अपघात घडला आहे. केंद्रीय राखीव पोलिस दल (CRPF) चे जवान घेऊन जाणारा ट्रक खोल दरीत कोसळल्याने २ जवानांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, १२ जवान गंभीर जखमी झाले आहेत. अपघात घडताच तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आलं आणि सर्व जखमी जवानांना उपचारासाठी कमांड हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं आहे. अपघाताचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. स्थानिक प्रशासन व सुरक्षा यंत्रणांकडून घटनास्थळी तपास सुरू आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण सुरक्षा दलामध्ये शोककळा पसरली असून, अपघाताबाबत अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या वाहनाने १८ जवानांना घेऊन कडवा येथून बसंतगडकडे कूच केली होती. मात्र सकाळी सुमारे १०:३० वाजता ट्रकचा ताबा सुटल्याने वाहन दरीत कोसळले. या हृदयद्रावक घटनेत दोन जवानांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, १२ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच उधमपूरचे स्थानिक पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि बचावकार्य सुरू केले. सर्व जखमी जवानांना तातडीने उपचारासाठी जवळील रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, प्रशासनाकडून अधिक तपास सुरू आहे. उधमपूरमधील सीआरपीएफ वाहनाच्या भीषण अपघातानंतर स्थानिक रहिवाशांनी माणुसकीचं दर्शन घडवत तात्काळ मदतीसाठी पुढाकार घेतला.

## पुण्यात बोर्ड काढण्यावरून वाद , तरुणावर कोयत्याने वार; काँग्रेसच्या माजी नेत्यावर गुन्हा दाखल



पुणे : पुण्यात गुन्हेगारीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे . कधी खून, मारामाऱ्या, दरोडे, लुटमार , तर कधी कोयता गँग यासारख्या घटना उघडकीस येत असतात. अशातच आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक गोपाळ तिवारी यांच्यासह पाच जणांवर विश्रामबाग पोलिसांनी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. बोर्ड लावल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणातून हा प्रकार घडला असून, दोघांनी दिलेल्या तक्रारीनुसार परस्पर विरोधी गुन्हे पोलिसांनी दाखल केले आहेत. नारायण पेठेतील केळकर रस्त्यावर तिवारी यांचे मुरलीधर व्हेज हे हॉटेल आहे. त्यापासून जवळच असलेल्या निघोजकर मंगल कार्यालयाजवळ हा प्रकार घडला .

स्वप्नील रामचंद्र मोरे (वय ३४,रा. नारायणपेठ) यांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी गोपाळ शंकर तिवारी (वय ६६, रा. घोलेरोड शिवाजीनगर), हर्ष उर्फ नन्नु शंकर शिर्के (वय २९, रा.नारायपेठ), निखील दिपील जगताप (वय ३३, रा.शनिवारपेठ), मुकूंद शंकर शिर्के (वय २७, रा.नारायणपेठ), अभिषेक उमेश थोरात (वय २२, रा.दत्तवाडी) यांच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. यातील हर्ष,निखील, मुकुंद आणि अभिषेक या चौघांना पोलिसांनी अटक केली आहे.

## अवयवदानात महाराष्ट्र देशात अव्वल!

मुंबई : अवयवदानाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, गेल्या वर्षी राज्यात १९८ ब्रेन-डेड दात्यांची नोंदणी झाली आहे. यामुळे महाराष्ट्र तेलंगणा, तामिळनाडू आणि कर्नाटक यांसारख्या राज्यांच्या पुढे आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथील 'झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर्स'ने 'ग्रीन कॉरिडॉर'चा वापर करून अवयवांची जलद वाहतूक करून आणि प्रत्यारोपण गतीमान करून या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एका उल्लेखनीय उदाहरणात, मुंबईतील एका १६ वर्षीय मुलाला फेब्रुवारी २०२५ मध्ये ब्रेन-डेड घोषित केल्यानंतर, त्याचे अवयव चार वेगवेगळ्या रुग्णांना प्रत्यारोपित करण्यात आले. मुंबईत मोठ्या संख्येने लोक अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत, ज्यात ४,००० लोकांना किडनी आणि २,००० लोकांना लिव्हरची गरज आहे. विविध संस्थांमध्ये जनजागृती मोहिम सुरू असूनही, धार्मिक आणि सामाजिक अडथळे, विशेषतः ग्रामीण भागात, अजूनही एक आव्हान आहे, जिथे कुटुंबाची संमती मिळवणे कठीण होते. एका वृत्तपत्रानुसार, भारतातील अपघातांची मोठी संख्या पाहता, ब्रेन-डेड रुग्णांचे अवयव ओळखण्यासाठी आणि वापरण्यासाठी अधिक संघटित प्रणाली तयार केल्यास प्रत्यारोपणाची संख्या लक्षणीय वाढू शकते.

## पोस्टाचा रजिस्टर्ड पोस्ट सेवेवर 1 सप्टेंबरपासून पूर्णविराम देण्याचा निर्णय

मुंबई : तुम्ही कधी विचार केलाय का, एका पत्रात किती भावना दडलेल्या असतात? एका क्षणाचा निरोप, आनंदाचे क्षण आणि वर्षांची आठवण किंवा एखादा महत्त्वाचा सरकारी दस्तऐवज, जो तुमचं आयुष्य बदलू शकतो. पोस्ट ऑफिस म्हणजे फक्त एक इमारत नाही, ती एक भावना आहे. पण आता याच पोस्ट ऑफिसमध्ये एक मोठा बदल होतोय, जो आपल्या सर्वांना थेट प्रभावित करणार आहे.

भारतीय टपाल विभागाने आपल्या जुन्या आणि विश्वासार्ह सेवांपैकी एक असलेल्या रजिस्टर्ड पोस्ट सेवेवर १ सप्टेंबरपासून पूर्णविराम देण्याचा निर्णय घेतला आहे. ही सेवा आता स्पीड पोस्ट सेवेत विलीन केली जाणार असून, हा निर्णय टपाल प्रक्रिया अधिक सुलभ व एकसंध करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे, अशी माहिती बेंगळुरूच्या जनरल पोस्ट ऑफिसमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.



रजिस्टर्ड पोस्ट ही सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची सेवा मानली जाते. ती केवळ संबंधित प्राप्तकर्त्यालाच दिली जाते आणि महत्त्वाचे कायदेशीर दस्तऐवज, सरकारी पत्रव्यवहार यासाठी वापरली जाते. दुसरीकडे, स्पीड पोस्ट ही वेळेवर वितरणासाठी प्रसिद्ध असून, ती केवळ पत्त्यासाठी असते. ज्यामुळे घरात जो कुणी असेल तो ते पत्र स्वीकारू शकतो.

मात्र, मागील काही वर्षांपासून रजिस्टर्ड पोस्टची मागणी कमी झाल्याचे पाहता, या दोन सेवांचा एकत्रित उपयोग अधिक परिणामकारक ठरणार आहे. विलीन केल्यानंतर, स्पीड पोस्टसाठी 'ॲड-ऑन' सेवा मिळेल, म्हणजेच ग्राहक आपल्या मेलला 'पत्ता-विशिष्ट' किंवा 'व्यक्ती-विशिष्ट' बनवू शकतील.

या निर्णयामुळे स्पीड पोस्टच्या दरात कोणताही बदल होणार नाही, उलट स्थानिक स्तरावर ही सेवा अधिक किफायतशीर ठरणार आहे. सध्या रजिस्टर्ड पोस्टसाठी (२० ग्रॅमपर्यंत) स्थानिक दर रु. २२ आहे, तर स्पीड पोस्टसाठी (५० ग्रॅमपर्यंत) स्थानिक दर फक्त रु. १५ आहे. संपूर्ण भारतात लागू होणारा 'वन इंडिया वन रेट' स्पीड पोस्टसाठी रु. ३५ आहे (कर वगळता). कर्नाटकमधील उच्च न्यायालयानेही रजिस्टर्ड पोस्टऐवजी स्पीड पोस्टचा पर्याय स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

ही ऐतिहासिक सेवा बंद होणार असली

## चौपट मजा आणि चौपट धमाल घेऊन येतोय आता होऊ दे धिंगाणाचा चौथा सीझन

नागपूर : आता होऊ दे धिंगाणाच्या तिन्ही पर्वांना प्रेक्षकांनी भरभरुन प्रेम दिलं. रोजच्या धकाधकीच्या जीवनात निखळ मनोरंजनाचे क्षण घेऊन येणारा हा कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर सातासमुद्रापलीकडेही आवडीने पाहिला जातो. प्रेक्षकांचा हा लाडका कार्यक्रम चौपट मजा आणि चौपट धमाल घेऊन पुन्हा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज झालाय. ९ ऑगस्टपासून रात्री ९ वाजता आता होऊ दे धिंगाणाचं चौथं पर्व सुरु होत आहे. प्रत्येत पर्वात प्रेक्षकांना काहीतरी नवं देण्याचा स्टार प्रवाह वाहिनीचा प्रयत्न असतो. चौथ्या पर्वात प्रेक्षकांना थीमपार्कची जादू अनुभवता येणार आहे. थीमपार्क मध्ये ज्याप्रमाणे अद्भूत आणि अविश्वसनीय गोष्टींची सफर घडते अगदी त्याप्रमाणेच धिंगाणाचा मंच भन्नाट गेम्सच्या माध्यमातून मनोरंजनाची धमाल सफर घडवणार आहे. मागच्या पर्वात सुपरहिट ठरलेल्या स्मायली काय गायली, धुऊन टाक, गोरी गोरी पान गाते किती छान या सुपरहिट फेऱ्या नव्या ट्विस्टसोबत या पर्वातही असणार आहेत. याच्या सोबतीला अनेक नव्या अतरंगी फेऱ्या देखिल पाहायला मिळतील. सर्वात महत्त्वाचं म्हणजे गेल्या तीन पर्वात ज्या फेरीची सर्वाधिक चर्चा रंगली त्या साडे माडे शिंतोडेचं भव्यदिव्य रुप या पर्वाचं प्रमुख आकर्षण ठरेल.

एनर्जेटिक सुपरस्टार आणि सर्वांचा लाडका होस्ट आणि दोस्त सिद्धार्थ जाधव या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुन्हा एकदा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज आहे. चौथ्या पर्वाविषयी सांगताना सिद्धार्थ जाधव म्हणाला, 'तुमचा कार्यक्रम कधी बंद होणार यापेक्षा तुमचा कार्यक्रम कधी सुरु होतोय याची जेव्हा प्रेक्षकांकडून विचारणा होते तेव्हा तेच त्या कार्यक्रमाचं यश असतं. मी स्वप्नातही विचार केला नव्हता की इतकं यश आता होऊ दे धिंगाणाला मिळेल. या कार्यक्रमाचा चौथा सीझन करताना अतिशय आनंद आणि अभिमान वाटतोय. याचं श्रेय स्टार प्रवाह वाहिनी आणि आता होऊ दे धिंगाणाच्या संपूर्ण टीमला जातंय.

## पाच वर्षांतच कॉलम तुटले भेगा पडले रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण

### फारोळा गावातील हरिकुंज सोसायटीची इमारत धोकादायक; इमारत कोसळन्याच्या अवस्थेत

तभा वृत्तसेवा

बिडकिन दि ७ ऑगस्ट

पैठण तालुक्यातील फारोळा येथील नामांकित असलेली हरिकुंज सोसायटी सध्या मोठ्या वादाच्या भोवऱ्यात सापडली असून ,अवघ्या काही पाच वर्षांपूर्वी बांधलेली ही सोसायटी सध्या अतिधोकादायक स्थितीत पोहोचली आहे, बिल्डिंगच्या कॉलममध्ये मोठ्या प्रमाणात तडे भेगा पडले आहेत कॉलमची परिस्थिती बघता कधीही कोसळू शकते स्पष्ट झाले आहे. हे पाहता कमीतकमी ५० वर्ष टिकणाऱ्या बांधकामाला इतक्या लवकर तडे भेगा पडने गंभीर बाब आहे ,संभंधित रहिवाशी च्या तक्रारीनुसार . बांधकामाला तीन मजली परवानगी असूनही .चार मजली इमारत उभी करण्यात आली कशी. हे केवळ नियमभंग नाही, तर शेकडो रहिवाशांच्या जिवाशी खेळण्याचे कृत्य ठरत आहे.दि.२ ऑगस्ट रोजी हरिकुंज सोसायटीत. राहणाऱ्या काही रहिवाशांच्या लक्षात आले







की, तळमजल्यावरील महत्त्वाचे कॉलम तुटलेले. व डॅमेज झालेले आहेत. व त्याला जॉग च्या साहाय्याने सद्या रिपेर करण्याचा प्रयत्न चालू आहे .या माहितीने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. रहिवाशांनी तत्काळ बिडकीन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.रहिवाशांचे म्हणणे आहे की, सध्या इमारतीच्या भिंतींना दिवसेंदिवस वाढणाऱ्या भेगा पडत आहेत. त्यामुळे कधी इमारत कोसळेल, याचा काही भरोसा नाही . म्हणून येथील रहिवासी मागील तीन दिवसांपासून आम्ही. रात्री आमच्या घरी झोपत नाही. नातेवाईक मित्रांच्या घरी आणि सोसायटीच्या मंदिरात चार दिवसांपासून धोकादायक इमारतीमधील कुटुंब मुक्काम करीत आहे. दिवसा सोसायटीच्या आवारात फिरून दिवस काढत आहे.ही सोसायटी प्रामुख्याने कामगार वर्गाने .आपल्या आयुष्यभराची कमाई गुंतवून घेतलेली आहे. मात्र आता, उघडपणे फसवणूक झाल्याचे चित्र त्यांच्या समोर उभे ठाकले आहे.हरिकुंज सोसायटीचे मालक दीपक झुंजुनवाला यांनी या प्रकल्पाचे काम हाताळले होते. रहिवाशांचा आरोप आहे की, बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले, नियमबाह्य मजले बांधले गेले आणि आता त्याचे परिणाम सामान्य जनतेच्या जीवावर उठले आहेत. संबंधित बांधकामव्यावसायिकावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.ही बाब सर्व परिसरात पसरली असून हीकुंज सोसायटीला अधिकाऱ्यांनी दिली व्हिजिट बिल्डिंगची परिस्थिती बघितल्यानंतर कॉलम डॅमेज झाले आहेत तडे पडले आहेत ही बिल्डिंग कधीही कोसळू शकते म्हणून पैठण तालुक्याचे तहसीलदार अधिकारी ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनास फारोळा ग्रामपंचायत ने नोटीस लावण्यात आली. ही बिल्डिंग लवकरात लवकर खाली करण्यात यावी बिल्डिंगची अवस्था खूप बिघडलेली आहे कोसळण्याची शक्यता असल्यामुळे हे नोटीस लावण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले आहे याप्रसंगी गटविकास अधिकारी मॅडम मनोरमा गायकवाड ,बिडकीन मंडळ अधिकारी रविन्द्र जोशी , फारोळा तलाठीरवींद्र मुखेडे,फारोळा ग्रामसेविका आशा तुपे , सरपंच सलीम पठाण , दिलीप गोरे,मानवाधिकार शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके आदी सर्व अधिकारी उपस्थित होते.या हरिकुंज सोसायटी मालक यांनी फारोळा ग्रामपंचायत कडून कोणतीही परवानगी घेतले नसुन या सोसायटीचे ग्राम पंचायत मध्ये नोंद नाही यांच्याकडे काही वर्षापासून कर बाकी आहे अशी माहिती आशा तुपे व सरपंच सलीम पठाण यांनी सांगितले

## पावसाअभावी राखी व्यवसायात घट; कमी किमतीच्या राख्यांना पसंती !

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, ७ ऑगस्ट : बहीण - भावाच्या पवित्र नात्याचा ' सण म्हणजे रक्षाबंधन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे . या सणाला बहीन आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते व या राखीच्या बदल्यात भावाने जन्मभर बहिणीचे रक्षण करावे, असे या सणाचे महत्व आहे

यंदा शनिवारी (. ९ ऑगस्ट ) रोजी साजरा होणाऱ्या सणासाठी अजिंठा परिसरातील बाजार पेठ सजल्या आहेत . मात्र, अजिंठा परिसरात या वर्षी पाऊस रुसला आहे. पावसाने ओढ दिल्याचा फटका राखी विक्रेत्यांना बसत आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेने व्यवसायात २० ते २५ टक्क्यांनी घट होण्याची चिन्हे आहेत.

शहरात राखी विक्रीची मोठी दुकाने थाटण्यात आली असून, व्यावसायिकांना ग्राहकांची प्रतीक्षा आहे. या वर्षी महागड्या राख्यांना



**रोजगार नसल्याने कमी किमतीच्या राख्यांना मागणी**

**या वर्षी कमी किमतीच्या राखींना ग्राहकांकडून पसंती दिली जात आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत राखी विक्रीच्या व्यवसायात घट झाली आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्राहकांची संख्या खूपच कमी झाली आहे.**

**- छोटु दुसाद, राखीविक्रेता, अजिंठा**

फारसे ग्राहक नाहीत.

रक्षाबंधनाचा सण दर वर्षी उत्साहात साजरा होता. या वर्षी या सणाला दुष्काळाची किनार लागली आहे. बहीण-भावांचा हा सण पारंपरिक पद्धतीने साजरा होतो .

सिल्लोड शहराबरोबरच ग्रामीण भागातही राखी विक्रीची दुकाने लावण्यात आली आहेत. पावसामुळे बाजारपेठांमध्ये मंदीचे सावट आहे. मंदीचा फटका लहान-मोठ्या सर्वच व्यावसायिकांना बसत आहे.

## स्टेट बँकेच्या महिला अधिकाऱ्यास दमदाटी; गुन्हा दाखल

कन्नड :- दि.०७ ऑगस्ट -कन्नड शहरातील विवेकानंद नगर भागात न्यायालयाच्या आदेशानुसार घरातील सामान बाहेर काढण्यासाठी गेलेल्या स्टेट बँकेच्या महिला अधिकारीस अडवून शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली. या प्रकरणी तीन व्यक्तींविरोधात कन्नड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीपा अमित कुलकर्णी (वय ४९, रा. मुंबई) या भारतीय स्टेट बँकेच्या छत्रपती संभाजीनगर येथील शाखेत मुख्य प्रबंधक पदावर कार्यरत आहेत. त्या न्यायालयाच्या आदेशानुसार ७ ऑगस्ट रोजी सकाळी १०.१५ वाजता कन्नड येथील रेसिडेन्सी प्लॉट नं. ३, विवेकानंद नगर येथे गेलेल्या होत्या. त्यावेळी मीराबाई तायडे, सोपान तायडे आणि पंकजा तायडे (रा. शिवाजीनगर, कन्नड) यांनी त्यांना अडवले आणि ही जागा आमची आहे, तुम्ही काही काढू शकत नाही असे म्हणत शिवीगाळ व दमदाटी केली.

या प्रकरणी कलम २२१, १३२, ३५२, ३५१(२)(३)(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

**कन्नड नगर परिषद ता. कन्नड, छत्रपती संभाजीनगर**

**जाहीर निविदा सुचनेची नोटीस**

मुख्याधिकारी, नगर परिषद कन्नड मार्फत महाराष्ट्र नगर पंचायत लेखा संहिता, 2011 नुसार, कन्नड नगर परिषदचे सन 2024-25 आणि 2025-26 या आर्थिक वर्षातील उपार्जित तत्वावर दुहेरी नोंद लेखा पद्धती प्रमाणे लेखे तयार करणे तसेच GST, TDS PT. शासन खाती परतावा करणे विषयक कामासाठी ऑफलाईन पद्धतीने योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या ठेकेदारांकडून ब-1 नमुन्यात सिलबंद द्विपाकीट पद्धतीने निविदा मागवित आहे. कोरे निविदा प्रपत्र तसेच सविस्तर निविदा सुचना, निविदेच्या सविस्तर अटी व शर्ती व निविदा वेळापत्रक नगर परिषद कार्यालयात शासकिय सुटीचे दिवस वगळून दि. 20.08.2025 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून ते दि. 08.08.2025 रोजी सांयकाळी 05.00 वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत व बयाणा रक्कम तसेच अतिरीक्त सुरक्षा अनामत रकमा कन्नड येथे देय असलेल्या धनाकर्षाद्वारे अथवा कार्यालयात रोखीने स्वीकारण्यात येतील.

**स्वाक्षरीत**

**(ऋषिकेश बा. भालेराव)**

**मुख्याधिकारी नगर परिषद कन्नड**

## अग्रलेख...

# मानवी प्रवृत्तीला प्रकृतीचा तडाखा

भारतातील उत्तरेकडील उत्तराखंड हे राज्यच 'देवभूमी' म्हणून ओळखले जाते. या भागातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली हे गाव मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ रोजी ढगफुटीमुळे 'धराशायी' झाले. हिरव्यागार, निसर्गरम्य, जैवविविधतेने नटलेल्या आणि वेढलेल्या धराली या गावाजवळ उंच भागातून खीरगंगा नदी वाहते. ढगफुटीमुळे या नदीचे पात्र ओसंडून वाहू लागले. पाण्याच्या जबरदस्त वेगामुळे डोंगरकडे कोसळून पडले. या देवभूमीतील बरेच काही ते आपल्या सोबत घेऊन गेले. त्यात धरालीतील घरे, मंदिरे, उपाहारगृहे, पर्यटक निवास, पूल, रस्ते, वाहने, जनावरे आणि माणसे असे बरेच काही होत्याचे नव्हते झाले. यात मृतांचा सुरुवातीचा आकडा एकेरी असला तरी तो निश्चितपणे मोठा होईल असे असलेल्या लोकांच्या संख्येवरून दिसून येते. उंचावरून आलेले पाणी, दगड आणि चिखलांचे लोट यांनी धरालीतील स्थावर मालमत्तेसह खूप सारे मातीत मिसळून टाकले. या भागातील एक लष्करी छावणीसुद्धा वाहून गेली. पर्यटकांच्या सोयीसाठी असलेले २५ ते ३० 'होम स्टे' किंवा हॉटेल्स या प्रकृती प्रकोपात वाहून घेण्याची माहिती आहे. दहा भारतीय लष्करी जवान बेपत्ता असल्याचेही सुरुवातीचे आकडे आहेत. केवळ साठ सेकंदांच्या त्या निसर्ग प्रकोपात जीव व वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाल्याची, एका गावाचे रूपांतरच एका ढिगाऱ्यात झाल्याची मन सुन्न करणारी ही घटना आहे.

हिमालयाच्या कुशीतील उत्तराखंड अर्थात 'देवभूमी' गेल्या दोन दशकांमध्ये नैसर्गिक आपत्तींच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील बनली आहे. आल्हाददायक निसर्ग, अनेक तीर्थस्थळे, हिमशिखरांचे रमणीय सौंदर्य या सर्वांसोबतच, अनपेक्षित आणि विध्वंसक महापूर, ढगफुटीसारख्या घटनांनी या भागाला अलिकडे अधिकच तडाखे बसू लागले आहेत. अशा आपत्ती म्हणजे मानवी हव्यास तसेच भूगर्भ व हवामानातील अतिशय जटिल आंतरक्रियांचे संयुक्त परिणाम आहेत. या सर्व घटनांची शास्त्रीय मीमांसा, मानवी जबाबदारीचा मुद्दा आणि अशा घटनांतून आपल्याला मिळणारा धडा या सर्वांचा सखोल मागोवा सर्वांनीच घेत राहायला हवा. या घटना म्हणजे केवळ आकडेवारी नसते. हजारो लोकांचे जीवन क्षणात अंधकारमय करून टाकणाऱ्या या घटना असतात.

ढगफुटी म्हणजे एका छोट्याशा टापूत अतिशय अल्प काळात रेकॉर्डब्रेक असा पाऊस पडणे आणि त्याच्या परिणामी हिमकडा, डोंगरकडा यांचे कोसळणे. मुख्यत्वेकरून दुर्गम, पर्वतीय, अरुंद खोऱ्यांमध्ये अशा घटना घडतात. इथल्या तीव्र उतारांमुळे मान्सूनचे ढग सरळ त्या डोंगरावरील थंड हवेवर आदळतात आणि पटकन जबरदस्त स्वरूपात पडतात. त्याचा जोर इतरही घटकांना मिळतो आणि त्यातून नुकसान होते. ही असते ढगफुटी. अशा अनपेक्षित किंवा अप्रिय घटनांसाठी मानवी बेपर्वाई सर्वांत आधी जबाबदार असते. अनियंत्रित व निसर्ग विरोधी बांधकामे, ज्यापैकी काहींना 'विकास' असेही म्हणतात, देखील निश्चितच जबाबदार असतात. मोठमोठी हॉटेल्स, लॉज, रस्ते, पूल, रिसॉर्ट्स, व्यावसायिक इमारती असे सारे भूगर्भशास्त्रीय परीक्षणाविना उभारली जातात. सर्वांना पैसा कमावायचा असतो. सर्वांना रोजगार मिळवायचा असतो. त्यात कोण कुठे आणि कसे बांधकाम करते आहे, हे पाहिलेच जात असेल आणि ते नियमात बसते की नाही, याची खातरजमा केलीच जात असेल याची काहीही शाश्वती नाही. पर्यटनाचा उद्योग भारतात वाढत चालला आहे. पर्यटकांची संख्या कित्येक पटींनी वाढली. अवैध खाणी व नदीखोऱ्यांचे शोषण, वाळू, खडी खणनाने नद्यांचे गाळ वाहून जाणे, मातीचे व दगडांचे अवैध उत्खनन, जंगलतोड आणि जैवविविधतेवर हल्ला, जंगलांवर अतिक्रमण, हे सारे प्रकार सत्यानाश करणारेच असतात. आपण सत्यानाश केला तर निसर्ग महाविनाश करणारच, हे आपल्याला कळले पाहिजे. आवश्यक विकासात मोडणारे जलविद्युत प्रकल्प व मोठ्या इन्फ्रास्ट्रक्चरचे दडपण, नदीच्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळे, पाईप, धरणे, साठवण टाक्या, बोगदे, खनिज आणि गौण खनिजाच्या प्रचंड उत्खननामुळे डोंगर दुभंगण्यापर्यंत प्रसंग आलेले पाहण्यात आहेत. या सर्व घटना हवामान, भूगर्भबदल आणि मानवी हस्तक्षेप या तीन प्रमुख घटकांशी नाते सांगतात. ढगफुटीसारख्या आपत्तींमुळे उत्तराखंड राज्याची चर्चा होते. इतरही अनेक राज्यांमध्ये अशीच स्थिती आहे. खरे तर अशा घटनांतून आपण भारतीयांनी पर्यावरणीय, भौगोलिक, सांस्कृतिक आणि आर्थिक धडे घ्यायला हवेत. निसर्गाच्या सहनशक्तीची परीक्षा घेणाऱ्यांना परीक्षा द्याव्याच लागतील, हे लक्षात ठेवायला हवे. समाज, शासन- प्रशासन आणि वैयक्तिक जबाबदारीचे भान असायला हवे. मानवी हलगर्जीपणा वा बेपर्वाईमुळे अशा घटनांचे गांभीर्य वाढत असते. दरवर्षी कोट्यवधी भाविक व पर्यटक हिमालयात जातात. पर्यटकांची वाहतूक, प्लॅस्टिक, प्रदूषण आणि स्थानिक संसाधनांवरचा वाढता ताण हे सारे घटक पर्यावरण असंतुलनास कारणीभूत ठरतात. केदारनाथमध्ये हेलिकॉप्टरच्या प्रतीक्षेत लोक मृत्युमुखी पडणे, चमोलीमध्ये कामगार पुरात अडकणे ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. ही समस्या अक्राळविक्राळ आहे. अशा घटनांनंतर त्या नैसर्गिक की मानवनिर्मित अशी चर्चा नेहमीच होत राहते. चर्चेवरच सारे थांबते आणि पुढचे पाठ, मागचे सपाट अशा पद्धतीने आपले रहाटगाडगे सुरू असते. अशा बहुतांश घटना सुरुवातीला नैसर्गिकच वाटत असल्या तरी त्यामध्ये मानवी हव्यासाचा मोठा वाटा असतो हे विसरून चालणार नाही. 'भूमी' या कधीही न वाढणाऱ्या संपत्तीचा भयंकर असा हव्यास आपल्याला देशभर, गावोगावी, ठिकठिकाणी आढळून येतो. थोडीशीही रिकामी जागा दिसली की ती कशी घशात घालता येईल, याचाच विचार करणारे 'भू-माफिया' मानसिकतेचे लोक गल्लोगल्ली, गावोगावी असतात. सामान्य लोक देखील गेटच्या बाहेर थोडी सरकारी जागा दिसत असेल तर गेट पुढे सरकवण्यात धन्यता मानतात. उत्तराखंडमध्ये तर सपाट जागाच मर्यादित आहे. तेथे बांधकामे अवघड स्थितीत व अवघड ठिकाणीच केली जातात. धनदांडगे उद्योजक, बांधकाम व्यवसायी, राजकारणी, तथाकथित समाजसेवी अशा मंडळींचे येथे फावते. धंदेवाले तर चिरीमिरी देऊन काहीही करून घेऊ शकतात. रिकामा भूखंड लाटण्यासाठी किंवा नियमबाह्य बांधकाम करण्यासाठी हे लोक 'काय वाट्टेल ते' करत असतात. या अशा प्रवृत्तींमुळे आणि त्यांना मोकळे रान देण्याच्या 'अर्थपूर्ण' प्रशासकीय मानसिकतेमुळे वेगवेगळ्या निसर्गरम्य प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अपघात होतच राहणार. आता तरी सुधारायला हवे.

प्रकृतीशी खेळ करणारी प्रवृत्ती निसर्ग खपवून घेत नाही हे एक नव्हे हजारो वेळा दिसले. सतत दिसले. माणसं मेली. वित्तहानी झाली. भारत हा सौंदर्याने नटलेला देश आहे. अवैध बांधकामे, नैसर्गिक व्यवस्थेचे अनावश्यक नुकसान हे सारे या सौंदर्याला बाधा आणणारे घटक आहेत. निसर्गाचे सौंदर्य त्याच्या मूळ रूपातच टिकत असते. गरज असेल तेथे नियमांनुसार कामे व्हायलाच हवीत. कुणीही आणि कुठेही-काहीही-कितीही बांधून टाकले तरी त्याला वैधता प्रदान करणाऱ्यांनी जनाची नाही तर मनाची तरी ठेवली पाहिजे. शेवटी हा देश त्यांचाही आहे. त्यांचीही मुले-बाळे उद्या पर्यटनाला जातील. उद्योग-व्यवसाय करतील. निसर्गच नसेल तर पर्यटन नसेल. रोजगार आणि अन्य व्यवसायही नसतील. पण, मानवी हव्यास आणि बेपर्वाई कमी होत नाही. परवाच सर्वोच्च न्यायालयाने सरकारी यंत्रणेचे कान उपटले. अशाच पद्धतीने अवैध कामांना वैधता प्रदान करण्याचे पराक्रम तुम्ही करीत राहिलात तर एक दिवस हिमाचल प्रदेश दिसेनासा होईल, अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात केली. सरकार व प्रशासनाकडून पर्यावरणाचे संतुलन बिघडविणाऱ्यांवर अंकुश लावला जायलाच हवा, हे सर्वोच्च न्यायालयाला सांगावे लागत असेल तर समाज, सरकार यांचे कुठेच लक्ष नाही, हेच सिद्ध होते. आताही वेळ गेलेली नाही. हिमाचल प्रदेश, उत्तराखंडासह अशा सर्व राज्यांमध्ये झालेली बांधकामे तपासली पाहिजेत आणि जी नियमांत बसत नसतील त्यांच्या विरुद्ध ठोस कारवाई केली गेली पाहिजे. अवैधतेचे नियमन करण्याचा हव्यास सोडला तरच प्रकृती टिकेल आणि ती टिकली तरच सारे टिकेल.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# हायड्रोजनवर चालणारी वाहने

डिझेल, पेट्रोल, गॅससारख्या जैव-इंधनांच्या वाढत्या उपशामुळे आणि वापरामुळे पृथ्वीचे पर्यावरण धोक्यात आले आहे, येत आहे हे सर्वांना माहीतच आहे. चंगळवादी जीवनशैली बदलून मुळात खाजगी वाहनांचा वापर कमी करा, असे आवाहन सुरू होऊनही दोन दशके झाली; परंतु आपल्या सवयी बदलत नसल्याने वाहनांची विक्री वाढतेच आहे. त्यामुळे वाहनाच्या इंजिनच्याच स्वरूपात बदल करण्याबाबतचे संशोधन होऊन त्याला आलेले फळ म्हणजे इलेक्ट्रिक व्हेईकल्स म्हणजेच विजेवर (बॅटरीवर) चालणारी वाहने. गेल्या दशकात अशा वाहनांची संख्या जगभर वेगाने वाढली, परंतु त्यांच्याही काही मर्यादा आणि भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या समस्या आता दिसू लागल्या आहेत.

पहिली बाब म्हणजे किंमत. पारंपरिक वाहनांच्या तुलनेत ई-वाहने दीडपट दुप्पट महाग आहेत. पर्यावरणाची कितीही काळजी असली, तरी ही जादा किंमत अनेकांना या वाहनांपासून दूर ठेवते आहे. दुसरा मुद्दा त्यांच्या 'रेंज'चा आहे. म्हणजेच एकदा बॅटरी चार्ज केल्यावर ई-वाहन कापू शकणारे अंतर. साधी ई-वाहने जेमतेम ७० ते ९० किमी जातात; मग ती दुचाकी असोत वा चारचाकी. नवी आधुनिक वाहने ३०० किलोमीटरपर्यंतही जाऊ शकतात. पण त्यांच्या किमती खूपच जास्त आहेत. म्हणजे गोल फिरून आपण पुन्हा मूळ समस्येकडेच येतो. शिवाय बॅटरी चार्ज होण्याची क्रिया वाहन चालत असताना होत असते (मग ते पारंपरिक असो वा विजेवर चालणारे). अनेक जणांचे आठवड्यातून किमान दोनदा असे २००-३०० किलोमीटर दूर जाणे होते. पण अनेकांचे असे येणे-जाणे कमी असते. त्यामुळे बॅटरी आपोआप चार्ज होत नाही. परिणामी बॅटरी चार्ज करण्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागतो. चार्जिंग घरीही करता येते, परंतु त्यासाठी काही तास लागतात. बाहेर हायवेवर अद्याप चार्जिंग स्टेशन्सची संख्या पेट्रोल पंपांच्या मानाने अगदीच नगण्य आहे. त्यामुळे जगभरच्या अनेक वाहनचालकांवर सतत बॅटरी संपण्याची टांगती तलवार असते. बरे, ग्रामीण किंवा विरळ वस्तीच्या भागात चार्जिंगची सोडा, विजेच्या उपलब्धतेचीच हमी नसल्याने तूर्त तरी ई-वाहने शहरी भागांमध्येच अडकली आहेत.

डिझेलचा बराचसा वापर व्यापारी कारणांसाठी म्हणजे मालवाहतुकीसाठी केला जातो. त्यामुळे ट्रक्स विजेवर चालू शकले तर जैवइंधनांची बरीच बचत होईल. परंतु या रूपांतरणाचा खर्च खूप आहे. शिवाय रेंजची समस्या कायमच असल्याने मालवाहतूकदार या वाहनांसाठी फारसे उत्सुक नाहीत. विजेवरची वाहने वापरात आलेल्याला आता एक दशक झाले असून आता एक वेगळीच समस्या समोर येत आहे. या वाहनांमधील बॅटरी विशिष्ट प्रकारची असते. म्हणजे हमरस्त्यावरील बॅटरीच्या दुकानात मिळणारी नेहमीची बॅटरी यांना चालत नाही. यासाठीची वेगळी बॅटरी अत्यंत महाग तर आहेच; शिवाय तिचा पूर्णपणे पुनर्वापर करण्याचे म्हणजे ती रिसायकल करण्याचे मार्ग अद्याप दृष्टिपथात आलेले नाहीत. याचा अर्थ लक्षावधी इलेक्ट्रिक गाड्यांच्या तितक्याच निरुपयोगी बॅटऱ्यांच्या घातक कचऱ्याचे करायचे काय? पर्यावरणपूरक म्हणून विजेवरील वाहन वापरायचे आणि त्याची निरुपयोगी बॅटरी मात्र पर्यावरणाचे नुकसान करणार, अशी ही विचित्र परिस्थिती आहे.

...तर हे झाले विजेवरील वाहनांचे तोटे आणि मर्यादा. गेल्या दशकापासून मात्र हायड्रोजन वायूवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. अद्याप यांचा इलेक्ट्रिक कार्सइतका बोलबाला नसला, तरी बीएमडब्ल्यू आणि स्टोलांटिस या मोठ्या कंपन्यांनी याबाबतच्या संशोधन आणि विकास कार्यक्रमांमध्ये मोठी गुंतवणूक केल्याने या क्षेत्राकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (आणि इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे व वापरण्याचे बंधन आता अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपरिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यामधीलच एक महत्त्वाचे पाऊल आहे. सध्या जागतिक स्तरावर विविध कारणांमुळे आर्थिक मंदीचे सावट आहे. महागाई मात्र सर्वत्र वेगाने वाढते आहे. यामध्ये सामान्य नागरिकांना त्रास देणारा घटक म्हणजे इंधनाचे दर. अशा परिस्थितीत हायड्रोजनसारख्या पर्यायी इंधनाकडे वापरकर्त्यांचे लक्ष वळणे स्वाभाविक आहे. विजेवरील वाहनांच्या निर्मितीमागे खंबीरपणे उभ्या असलेल्या फोक्सवॅगनसारख्या कंपनीनेही एकदा टाकी फुल केल्यावर गाडीला तब्बल २००० किलोमीटर नेऊ शकेल, असा 'फ्युएल सेल' बनवण्याच्या दिशेने संशोधन आरंभिले आहे. बीएमडब्ल्यूचे सीईओ ऑलिव्हर झिप्स यांनी '२०३० च्या आत आपली हायड्रोजन वाहने अमेरिकेत विक्रीला उपलब्ध होतील' असे सांगितले आहे. युरोपीय महासंघाने यासंदर्भात दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रक्सना उत्तेजन देणे आणि हायड्रोजन भरण्याची सोय दर १०० किलोमीटरवर करून देणे. वाहनांची संख्या (पर्यायाने प्रदूषण) भरपूर असलेल्या चीनमध्येही २०३० पर्यंत सुमारे एक लाख (फ्युएल सेल इलेक्ट्रिक व्हेईकल) रस्त्यांवर आणण्याची योजना आहे. कार्बन-उत्सर्जनाचे प्रमाण शून्यावर आणायचे असेल (नेट झीरो २ पॉलिसी) तर हायड्रोजनपासून सुरुवात करावी लागेल, असे बहुतेक वाहनतज्ज्ञांचे मत आहे. न्यू ऑटोमोटिव्ह ॲण्ड मोबिलिटी एक्स्प्लोरेशनच्या सांगण्यानुसार त्यांनी फ्युएल सेल तंत्रज्ञानावरील वाहनांच्या रिफ्युएलिंग म्हणजेच पुनर्भरणाचा प्रश्न वेगळ्या प्रकारे सोडविला आहे. त्यांनी आपल्या गाडीला हायड्रोजनच्या दोन टाक्या दिल्या आहेत त्यापैकी एक 'फिक्स्ड' आहे (इतर वाहनांप्रमाणे) परंतु दुसरीमध्ये हायड्रोजनने भरलेल्या, बाहेर काढण्याजोग्या सहा कॅप्सूल्स बसवल्या आहेत. या कॅप्सूल्स विविध दुकानांमार्फत सुट्या विकत मिळण्याची सोय कंपनी करत आहे. म्हणजेच ही टाकी भरण्यासाठी 'हायड्रोजन पंपा'वर थांबण्याची गरज नाही. दोन्ही टाक्या भरलेल्या असल्या की, ही गाडी साडेसातशे किलोमीटर अंतर कापू शकेल. ही कार २०२६ नंतर बाजारात येणार आहे.

'केपजेमिनी' या सल्ला सेवा देणाऱ्या प्रसिद्ध कंपनीच्या वाहन विभागाचे मुख्य अलेक्झांडर ऑदिन यांचा विश्वास आहे की, फ्युएल सेलचे तंत्र व्यापारी वाहने आणि मोठ्या गाड्यांप्रमाणेच दैनंदिन वापराच्या छोट्या गाड्यांमध्येही यशस्वीरीत्या वापरता येईल. भावी वाहन उद्योगात अशा गाड्यांचा मोठा वाटा असेल असे त्यांना वाटते. ही हायड्रोजन कार कशी चालते, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाईपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य. फ्युएल सेलची रचना बॅटरीसारखीच असते. एका बाजूने हायड्रोजन आत सोडला जातो. तो तेथील कारक रसायनाच्या (कॅटेलिस्ट) संपर्कात येतो आणि हायड्रोजनच्या अणूंचे इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉन या कणांमध्ये विभाजन होते. हे इलेक्ट्रॉन वाहनामधील उच्च वीजदाबाच्या रचनेमधून जाऊन वाहनाच्या बॅटरीला किंवा थेट वाहनाला ऊर्जा पुरवतात. २०२२ च्या मध्यावर टोयोटाने आपली 'मिराइ' ही भारतातील पहिली हायड्रोजन कार सादर केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संसद भवनापर्यंतचा प्रवास या गाडीमधून केला. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना म्हणता येईल की, कोणतेही एक तंत्रज्ञान श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा विविध सर्वोत्तम तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# 'लव्ह जिहाद' सामाजिक समस्या

प्रेम ही निर्मळ भावना आहे. जात, धर्म बघून प्रेम होत नाही. ज्याने जसा चष्मा घातला असेल तसेच त्याला दिसते. २१ व्या शतकात एकीकडे जग जवळ असताना दुसरीकडे काही लोक धर्मासारख्या बाबी कालबाह्य असल्याच्या चर्चा रंगवतात. 'लव्ह जिहाद' ही बुरसटलेले विचार असलेल्यांच्या डोक्यातील काल्पनिक बाब आहे. त्यातही हिंदुत्ववादी संघटनांनी मोठा केलेला हा बागुलबुवा असल्याचे मत अनेकदा तथाकथित बुद्धिजीवी म्हणविणाऱ्यांकडून जोरकसपणे व्यक्त होते. मुळात 'लव्ह जिहाद' आहे हे पहिल्यांदा सांगणाऱ्यांपैकी कुठल्याही हिंदुत्ववादी संघटना नव्हत्या तर काही मुस्लिम युवक धर्मांतरणाच्या उद्देशाने हिंदू आणि ख्रिश्चन युवतींना प्रेमाच्या भूलथापा देऊन फसवीत आहेत. त्यांचे धर्मांतरण करीत आहे आणि याच उद्देशाने ते काम करीत आहेत, असा दावा २००९ साली लंडनचे पोलिस आयुक्त इयान ब्लेअर यांनी केला. याच दरम्यान केरळ येथील पोलिस महानिदेशक जेकब पुन्नोज यांनी एका अहवालात गैरमुस्लिम मुलींना धर्मांतरणाच्या हेतूने फसविण्यासाठी काही संघटना काम करीत असल्याचे निरीक्षण नोंदविले होते. त्याच वेळी कम्युनिस्ट पक्षाचे व्ही. एस. अच्युतानंद यांनी 'लव्ह जिहाद'चा मुद्दा उपस्थित केला होता. यातील काही प्रकरणे न्यायप्रविष्ट झाल्यानंतर केरळ उच्च न्यायालयानेदेखील त्यावेळी यात तथ्य असल्याचे म्हटले होते.



ओळख लपवून, भौतिक सुखाचे आमिष दाखवून काही प्रकरणांमध्ये तर अमली पदार्थांद्वारे सुनियोजित पद्धतीने कोवळ्या वयातील मुलींची फसवणूक करून धर्मांतरणाचा डाव 'लव्ह जिहाद'च्या आड सुरू असल्याचे समोर आले आहे. त्यातच आता छांगुर बाबा अर्थात जलालुद्दीन याला अटक करण्यात आली. त्याने तब्बल १५०० पेक्षा अधिक हिंदू मुलींचे 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून धर्मांतरण केल्याची चर्चा आहे. एकेकाळी दारिद्र्यात असलेल्या जलालुद्दीनकडे तब्बल ३५० कोटींची संपत्ती असून त्याच्या चौकशीत अनेक आश्चर्यकारक बाबी समोर आल्यात. या प्रकरणानंतर तर 'लव्ह जिहाद' हा सुनियोजित कट असल्याचेच स्पष्ट होते. 'लव्ह जिहाद' केवळ धर्मांतरणासाठीचाच डाव नव्हे, तर देशाविरोधात असलेले मोठे षडयंत्र आहे. या षडयंत्रातील धर्मांतरणाचा उद्देश जेव्हा फसतो त्यावेळी यात अडकलेल्या मुलीचा जीव घेण्यास देखील हे नराधम मागेपुढे पाहत नाही. यावेळी धर्म ही कालबाह्य बाब असून प्रेम धर्म पाहून होत नाही, असा युक्तिवाद करणाऱ्या तथाकथित बुद्धिजीवी म्हणविणाऱ्यांची मात्र दातखीळ बसलेली असते. महाराष्ट्राच्या लगत असलेल्या मध्यप्रदेश येथे नुकत्याच घडलेल्या घटनेमुळे याबाबतची चर्चा पुन्हा होते आहे. मध्यप्रदेशातील नवारा या भागात राहणाऱ्या ३५ वर्षीय भाग्यश्री हिने धर्मांतरण आणि लग्नाला नकार दिला म्हणून शेख रईस याने तिचा गळा कापून जीव जाईपर्यंत तिच्यावर चाकूने वार केले. त्यापूर्वी तो तिला वारंवार धर्मांतरण कर, लग्नाला होकार दे यासाठी दबाव आणत होता. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हे दाखल करून रईसला अटक केली आहे. सहज मिळत नसेल तर ओरबाडण्याची वृत्ती असणाऱ्यांकडून दुसरी अपेक्षा तरी काय करावी. ही समस्या केवळ मोठ्या शहरांमध्ये आहे असे नाही तर हे षडयंत्र गावखेड्यापासून तालुका-जिल्ह्यापर्यंत पोहोचले आहे.

मानवी वेषात फिरणारे लांडगे सावजाच्या शोधात असतात. शिक्षणाच्या निमित्ताने कुटुंबापासून लांब राहणाऱ्या कोवळ्या वयातील मुली हे जणू आपलं भक्ष्य आहे, अशा आविर्भावात जसा शक्य असेल तसा लचका तोडण्यासाठी तयार असतात. मध्यंतरी अकोल्यात ऑटोने आपल्या रूमवर जाण्यासाठी बसस्थानकावरून निघालेल्या मुलीशी अभद्र व्यवहार ऑटोचालक शांतिदूताने केला. मुलीने समयसूचकता दाखवून आरडाओरडा करीत त्याच्यापासून सुटका करवून घेतली म्हणून नशिबाने ती वाचली. दुसऱ्या प्रकरणात भावनिक फसवणूक करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याचे प्रकरण ताजेच आहे. खरं म्हणजे 'लव्ह जिहाद'ने हिंदू संस्कृती, हिंदू संस्कार यासह राष्ट्रीय सुरक्षेला आव्हान दिले असल्याची वस्तुस्थिती असताना तथाकथित बुद्धिजीवी मात्र तर्कावर आधारित केवळ युक्तिवाद करतात. जोपर्यंत समाजातील सर्व घटक ही समस्या असल्याचे स्वीकारणार नाहीत, जोवर कुटुंबातील ज्येष्ठांचा मुलांशी संवाद नियमित होणार नाही. कुटुंबातील धार्मिक रूढी, परंपरांची जपणूक होणार नाही तोपर्यंत 'लव्ह जिहाद'च्या आड हिंस्र लांडगे लचके तोडतच राहतील.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# एका वादळी युगाचा अंत

झारखंडचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे सर्वेसर्वा शिबू सोरेन मंगळवारी अनंतात विलीन झाले. सोमवारी सोरेन यांचे राजधानी दिल्लीतील एका रुग्णालयात निधन झाले. झारखंडच्या रामगड जिल्ह्यातील नेमरा हे त्यांचे मूळ गाव. या गावातच त्यांच्या पार्थिवावर अन्त्यसंकार करण्यात आला. आदिवासींच्या हक्कासाठी लढणाऱ्या त्यांच्या वडिलांची, सोबरन मांझी, यांची गावातील सावकारांकडून हत्या झाली होती. आदिवासींना न्याय मिळवून देण्याची आपल्या वडिलांची लढाई शिबू सोरेन यांनी पुढे चालू ठेवली. १९६०-७० च्या दशकात शिबू सोरेन यांनी धानकटाई आंदोलन सुरू केले. आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी शिबू सोरेन आणि त्यांचे सहकारी जमीनदार आणि सावकारांच्या शेतात घुसून धानकटाई करायचे. येथूनच 'आदिवासींचे नायक' अशी त्यांची प्रतिमा तयार झाली. जनसामान्यांशी आपली नाळ जोडून ठेवण्यासाठी शिबू सोरेन यांनी आपल्या सहकाऱ्यांना मुष्टी भिक्षाटन अभियान राबवायला सांगितले होते. म्हणजे प्रत्येक आदिवासी माणसाच्या घरात जाऊन एक मूठभर धान्य आणि एक रुपया मागायचा.

शिबू सोरेन यांना झारखंडची जनता 'दिशोम गुरू' म्हणून संबोधित होती. दिशोम गुरू हे त्यांचे टोपणनाव नव्हते, तर जनतेने त्यांना प्रेमाने दिलेली पदवी होती. राज्यातील गोरगरीब जनतेचे दुःख मी फक्त समजून घेतले नाही तर त्यांची लढाई आपली लढाई म्हणून लढायला घेतली, दिशोम म्हणजे समाज आणि समाजाला दिशा दाखवणारा म्हणून लोक मला दिशोम गुरू म्हणायला लागले, असे शिबू सोरेन सांगत. शिबू सोरेन यांचे निधन झाल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे रुग्णालयात जाऊन अन्त्यदर्शन घेतले. यावरून त्यांचे राजकीय महत्त्व लक्षात येते. शिबू सोरेन आदिवासी समाजातील सर्वमान्य नेते होते. झारखंड राज्याची निर्मिती ही त्यांच्याच संघर्षाचे आणि आंदोलनाचे फळ होते. सोरेन यांची राजकीर्द लक्षणीय अशी होती. पहिल्या लोकसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागलेल्या शिबू सोरेन यांनी नंतर सात वेळा लोकसभेत दुमका मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. तीनदा ते राज्यसभेवर होते. आमदार म्हणून त्यांनी तीन वेळा झारखंडचे मुख्यमंत्रिपद भूषवले तर तीन वेळा डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात ते कोळसा आणि खाण मंत्री होते. पण मुख्यमंत्री असो की केंद्रीय मंत्री कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रत्येक वेळी शिबू सोरेन यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे तसेच गुन्हेगारी स्वरूपाचे अनेक आरोप झालेत. मात्र, प्रत्येक वेळी ते या आरोपातून सहीसलामत बाहेरही पडले.

शिबू सोरेन एका अर्थाने दुर्दैवी म्हणायला हवे. तीनदा मुख्यमंत्री असले, तरी त्यांना एकदाही सलग वर्षभर मुख्यमंत्रिपद भूषवता आले नाही. हीच बाब केंद्रीय मंत्रिपदाची. तीन वेळा केंद्रीय मंत्रिपद भूषवणाऱ्या सोरेन यांना एकदाही सलग वर्षभर मंत्रिपदावर राहता आले नाही. गंमत म्हणजे सोरेन आधी केंद्रात मंत्री झाले आणि नंतर झारखंडचे मुख्यमंत्री. बाबुलाल मरांडी आणि अर्जुन मुंडा यांच्यानंतर झारखंडचे तिसरे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. पहिल्यांदा ते २३ मे २००४ ते २४ जुलै २००४ या काळात डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात कोळसा आणि खाण मंत्री होते. मात्र, ३० वर्ष जुन्या एका प्रकरणात अटक वॉरंट जारी झाल्यामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. चिरुडिह येथे १९७५ मध्ये झालेल्या आदिवासी आणि मुसलमान यांच्यातील संघर्षात १० जणांचा बळी गेला; यात शिबू सोरेन एक आरोपी होते. केंद्रीय मंत्री असतानाही सोरेन यांना अटक करण्यासाठी झारखंड पोलिस दिल्लीत आले होते. शिबू सोरेन यांच्या नावाने अटक वॉरंट निघाल्यानंतर ते भूमिगत झाले. नंतर राजीनामा देत ते पोलिसांना शरण आले. महिनाभर तुरुंगात राहिल्यानंतर त्यांची जामिनावर सुटका झाली. जामिनावर सुटल्यानंतर काँग्रेस आणि झामुमो यांच्यातील राजकीय तडजोडीतून पुन्हा त्यांचा कोळसा आणि खाण मंत्री म्हणूनच केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला.

२००५ मध्ये झारखंड विधानसभेच्या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही. झामुमो आणि काँग्रेस आघाडीचे नेते म्हणून राज्यपालांनी सोरेन यांना सरकार स्थापण्यासाठी आमंत्रित केले. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतलेल्या शिबू सोरेन यांना विधानसभेत बहुमत सिद्ध करता आले नाही. त्यामुळे दहा दिवसांतच त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. २००८ मध्ये भाजपाच्या पाठिंब्याने सोरेन दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले, पण हे सरकारही फार दिवस टिकू शकले नाही. मतभेद झाल्यानंतर भाजपाने सोरेन सरकारचा पाठिंबा काढला, त्यामुळे सरकार कोसळले. यावेळी ४ महिने २२ दिवस ते मुख्यमंत्री होते. तिसऱ्यांदा ते ३० डिसेंबर २००९ ते ३१ मे २०१० असे पाच महिने मुख्यमंत्री होते. गंमत म्हणजे यावेळीही सोरेन यांनी भाजपाच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. पण राज्यसभा निवडणुकीच्या मुद्यावरून मतभेद झाल्यामुळे भाजपाने सोरेन सरकारचा पाठिंबा काढला आणि त्यांचे सरकार कोसळले. म्हणजे मुख्यमंत्रिपदाचे तीन कालखंड पकडून वर्षभरही मुख्यमंत्री नव्हते.

जानेवारी २००६ मध्ये शिबू सोरेन यांचा तिसऱ्यांदा डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. मात्र नोव्हेंबर २००६ मध्ये त्यांना पुन्हा मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यावेळी आपले खाजगी सचिव शशिनाथ झा यांच्या अपहरणाचा तसेच हत्येचा आरोप सोरेन यांच्यावर लागला. १९९३ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव सरकारविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आला होता. या प्रकरणात सरकारच्या बाजूने मतदान करण्यासाठी शिबू सोरेन आणि झामुमोच्या खासदारांनी लाच घेतल्याचा आरोप झाला. शशिनाथ झा या प्रकरणाचे साक्षीदार असल्यामुळे सोरेन यांनी त्यांची हत्या घडवून आणली, असा आरोप होता. २३ ऑगस्ट २००७ ला दिल्ली उच्च न्यायालयाने शिबू सोरेन यांना या प्रकरणातून मुक्त केले. नंतर सर्वोच्च न्यायालयानेही सोरेन यांना दोषमुक्त करण्याचा दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवला. कौटुंबिक आघाडीवरही शिबू सोरेन यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यांना दुर्गा, हेमंत आणि वसंत अशी तीन मुलं आणि अंजनी ही मुलगी. सुरुवातीला मोठा मुलगा दुर्गा सोरेन यांच्याकडे शिबू सोरेन यांचे राजकीय वारस म्हणून पाहिले जात होते. झामुमोचे महासचिव असलेले दुर्गा दोनदा आमदार होते. मात्र, २००९ मध्ये त्यांचे आकस्मिक निधन झाले. सीता सोरेन यांनी आपल्या पतीचा राजकीय वारसा चालवण्याचा प्रयत्न केला. झामुमोच्या महासचिवपदासोबत त्या तीनदा आमदारही झाल्या. मात्र कौटुंबिक आणि राजकीय मतभेद वाढल्यानंतर त्यांनी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला. शिबू सोरेन यांच्या निधनानंतर झामुमोतील एका वादळी युगाचा अंत झाला.

९८८१७१७८१७

### रस्त्यावरील भाजी बाजार आणि प्रचंड कचरा

नागपूर येथील लंडन स्ट्रीट म्हणजे ऑरेंज सिटी रोड, जयप्रकाश मेट्रो स्टेशनकडून खामलाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर शनिवारी भाजी बाजार भरतो. चांगली सुविधा आहे. परंतु हे भाजीवाले आणि ग्राहक नागपूरच्या स्वच्छतेची ऐसीतैसी करत आहेत आणि वाहतुकीला प्रचंड त्रास होतो आहे. खरे तर भाजीवाल्यांना फूटपाथ आणि त्यामागील भरपूर जागा आहे तिथे त्यांची दुकाने शनिवारी तेथेच लावावी हे अपेक्षित आहे. परंतु आता काही भाजीवाले आणि मुख्यत्वे फळवाले भर रस्त्यावर दुकान थाटतात. त्यांच्या समोर ग्राहक आपली गाडी पार्क करून खरेदी करतो. पूर्ण रस्ता ही मंडळी व्यापतात. फळ कापले की आणि भाजी निवडली की तो कचरा तेथेच फेकला जातो. ग्राहक अथवा विक्रेता कोणालाही त्यात गैर वाटत नाही हे दुर्दैव.

प्रशासन आणि पोलिस यांनी एकदातरी इथे फेरी मारावी आणि जे रस्त्यावर अतिक्रमण करतात त्यांना समज द्यावी. तसेच कचरा फेकणाऱ्याला शिक्षा व्हायलाच हवी. कारण रविवार सकाळी या भागात प्रचंड घाण पसरली असते आणि दुर्गंधी येते. स्वच्छ नागपूर म्हणणाऱ्या महापालिका प्रशासनाने येथे यावे आणि आपल्या स्वच्छतेचा आरसा आपणच बघावा. अतिक्रमण आणि अस्वच्छता यावर लागलीच उपाय झाला पाहिजे. बाजाराला विरोध नाही. पण जागरूक व जबाबदार नागरिक म्हणून आम्ही राहायला हवे की नाही? तसेच पोलिस व महापालिका प्रशासन यांची याबाबत काही जबाबदारी आहे की नाही?

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

●● ●●

## वाचक पत्रे

### युवा खेळाडूंची जबरदस्त कामगिरी

इंग्लंड विरुद्धच्या शेवटच्या कसोटीच्या शेवटच्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी अविश्वसनीय कामगिरी करत इंग्लंडचे चार फलंदाज बाद करून कसोटी जिंकली. ही कसोटी जिंकून भारताने तेंडुलकर-अँडरसन कसोटी मालिका बरोबरीत सोडवली. भारतीय संघाची ही कामगिरी जितकी कौतुकास्पद आहे तितकीच ती अभिमानास्पद आहे. मालिकेच्या सुरुवातीला इंग्लंडकडून भारताचा दारुण पराभव होईल असा अंदाज जाणकारांनी वर्तवला होता. मात्र भारताच्या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून जाणकारांचा हा अंदाज फोल ठरवला.

भारताच्या युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर नेत्रदीपक कामगिरी करून इंग्लंडला नामोहरम केले. शुभमन गिल या भारताच्या युवा खेळाडूने संपूर्ण मालिकेत कल्पक नेतृत्व करून आपल्यातील गुण दाखवून दिले. शिवाय त्याने उत्कृष्ट फलंदाजी करून विक्रमी धावा काढल्या. ही मालिका जरी बरोबरीत सुटली असली तरी एकप्रकारे हा आपला विजयच आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### ७ ऑगस्ट : शाश्वत शेती दिन

महाराष्ट्र शासनाच्या २९ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार महान कृषी-वनस्पती शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. मनकोम्ब सांबशिवम (एम. एस.) स्वामीनाथन यांचा जन्मदिवस राज्यात शाश्वत शेती दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. शाश्वत शेती म्हणजे पर्यावरणावर कमी परिणाम आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणारी शेती. तसेच भविष्यातील पिढ्यांसाठी अन्न आणि इतर संसाधने उपलब्ध राहतील याची काळजी घेऊन सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करणारी शेती. तामिळनाडूतील कुंभकनम येथे ७ ऑगस्ट १९२५ ला जन्मलेले डॉ. स्वामीनाथन यांनी दुष्काळाच्या झळा अनुभवल्या होत्या. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी वैद्यकीय शिक्षणाची कास सोडून कृषी विज्ञान शिक्षण घेण्याचे ठरविले होते. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रात प्रसिद्ध शास्त्रज्ञांसोबत काम करून उच्च उत्पादन क्षमता असलेले गहू, तांदूळ आणि अन्य वाण विकसित केले. यामुळे देश अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या मजबूत होण्यास मदत झाली. प्रयोगशाळेतील कृषी संशोधन हे वेळेत शेती - शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे अशी त्यांची नेहमी भावना असायची. आजसुद्धा या गोष्टीची अपेक्षा आहेच. देश त्यांना हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून संबोधतो. कृषी क्षेत्रातील अनन्यसाधारण योगदानाला अभिवादन म्हणून त्यांच्या जन्मशताब्दी जयंतीच्या औचित्याने दरवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस आपण शाश्वत शेती दिन म्हणून साजरा करतो. या निमित्ताने राज्यातील सर्व कृषी विद्यापीठामध्ये डॉ. एम. एस. स्वामीनाथन जैव-आनंद केंद्र स्थापन करण्यात येईल. एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशन सुद्धा आधुनिक कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नरत आहे. आजच्या दिवशी एक बाब प्रकर्षाने जाणवते ती अशी की डॉ. स्वामीनाथन हे राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे (२००४) अध्यक्ष असताना त्यांनी कृषी विकासासाठी अनेक शिफारशी केल्या होत्या. त्यापैकी पिकांना किमान आधारभूत किंमत ही उत्पादन खर्चाच्या ५० टक्के अधिक असावी या शिफारशीच्या अंमलबजावणीची आजही अपेक्षा आहे. ज्या वेळी ही शिफारस लागू होईल तो दिवस शेतीकरिता, भावी शेतकऱ्यांकारिता सुवर्ण दिन असेल आणि तीच शासनातर्फे डॉ. स्वामीनाथन यांना श्रद्धांजली राहील.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# आखाड्यावरील वृध्द इसमांना मारहाण करून जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद

## चार आरोपींना अटक, २.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ ऑगस्ट**

जिल्ह्यात शेतातील आखाड्यावर जाऊन वृध्दांना मारहाण करून लुटणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले असून त्यांच्याकडून एका दुचाकीसह २ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चारजणांना अटक करण्यात आली असून दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हिंगोली जिल्ह्यात मागील काही दिवसांमध्ये शेतातील आखड्यावर जाऊन वृध्दांना मारहाण करून लुटणारी टोळी कार्यरत झाली होती. या टोळीने औंढा नागनाथ शिवार व असोला शिवारात दोन ठिकाणी मारहाण करून दागिने पळविले होते. या प्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले होते.

या घटनेच्या तपासासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेची पथके स्थापन करण्यात आली होती. यामध्ये पोनि मोहन भोसले, उपनिरीक्षक माधव जिव्हारे, विक्रम विठुबोने, जमादार प्रेम चव्हाण, लिंबाजी वाहुळे, कोंडबा मगरे, विकी कुंदनानी, किशोर सावंत, आझम प्यारेवाले, विशाल खंडागळे यांच्यासह पोलिसांनी दोन पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आली होती.

या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पथकाने तांत्रिक बाबींचा अभ्यास करून या प्रकरणात उध्दव मारोती बोरकर, सचिन मदन गिरी, रा राहोली खुर्द, यश काळे रा पारधीवाडा हिंगोली, शेख खलील शेख रियाजोद्दीन रा बावनखोली हिंगोली यांना अटक केली. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्यातील चोरी केलेले सोन्या चांदीचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल जप्त केले तसेच त्यांच्याकडून जिल्ह्यातील आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी सांगितले. तर मारहाण करून लुटणारी टोळी जेरबंद झाल्यामुळे आखाड्यावरील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# आजपासून राज्यस्तरीय सब-ज्यूनिअर फेन्सिंग स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ ऑगस्ट**

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन यांच्या मान्यतेने व हिंगोली जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या पुढाकाराने २७ वी सब-ज्युनिअर राज्यस्तरीय फेन्सिंग तीन दिवशी स्पर्धा शुक्रवार दि.८ ऑगस्ट रोजी पासुन होणार असुन स्पर्धेची जय्यत तयारी करण्यात आली असल्याची माहिती गुरुवारी आयोजक अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषद मध्ये आयोजक तथा अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी आयोजना संदर्भात सविस्तर माहिती दिली. यावेळी क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, निरीक्षक प्रा.डॉ.पांडुरंग रणमाळ, हिंगोली जिल्हा फेन्सिंग संघटनेचे अध्यक्ष कल्याण देशमुख, उपाध्यक्ष प्रा.डॉ.आनंद भट्ट, सचिव संजय भुमरे, सहसचिव नरेंद्र रायलवार आणि राष्ट्रीय खेळाडू संदीप वाघ आदी उपस्थित होते.

या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार दि.८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या उपस्थित होणार असून दि.८ ऑगस्ट ते दि.१० ऑगस्ट रोजी आयोजित राज्यस्तरीय सब ज्युनिअर फेन्सिंग स्पर्धा होणार असून सदरील स्पर्धा ही जिल्हा क्रीडा संकुल लिंबाळा मक्ता हिंगोली येथे होत असल्यामुळे त्या ठिकाणी खेळाडूंना सोयी-सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. स्पर्धा कालावधीत खेळाडूंना भोजन, निवास, वाहन व्यवस्था या संदर्भात सुद्धा नियोजन करण्यात आलेले असून स्पर्धेच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त, आरोग्य विभागामार्फत सुसज्ज रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक सुद्धा ठेवली जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. स्पर्धेचे स्वागताध्यक्ष आ.हेमंत पाटील यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अगोदरच आढावा घेतला आहे. स्पर्धा परिसरातील प्रवेशद्वाराला हिंगोली व परभणी जिल्हयातील क्रीडा विभागात महत्वपुर्ण योगदान असलेले शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त स्व.प्रा.यु.डी. इंगळे यांचे नांव देण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. ही स्पर्धा १४ वर्षांखालील मुला-मुलींसाठीची राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धा दि.८ ते १० ऑगस्ट रोजी दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, लिंबाळा (मक्ता), हिंगोली येथे संपन्न होणार आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुरक्षा, निवास, भोजन, वाहन व्यवस्था, आरोग्य तपासणी आणि मैदानी व्यवस्था याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. हिंगोली जिल्ह्याला प्रथमच अशा दर्जेदार फेन्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान मिळाल्याने हिंगोली सह सर्व राज्यांची लक्ष या स्पर्धेवर लागले आहे. या पत्रकार परिषदेला संघटनेचे सर्व सदस्य व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# भाजीमंडईतील स्वच्छतेबाबत आ. मुटकुळेंच्या नगर पालिकेला सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ ऑगस्ट**

शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या भाजीमंडईमध्ये मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग तसेच सडका भाजीपाला साचल्यामुळे तिथे दुर्गंधी व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. याची माहिती मिळताच भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी तत्काळ भाजीमंडई परिसराची पाहणी केली. यावेळी भाजीमंडईतील कचऱ्याचे ढीग व दुर्गंधीवरून आ. मुटकुळे यांनी नगर पालिका प्रशासनाला तत्काळ स्वच्छता करण्याच्या सूचना दिल्या तसेच नेहमीसाठी या भागात स्वच्छतेसाठी उपाययोजना करण्याचेही सांगितले.

शहरातील भाजी मंडईमध्ये मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग तसेच सडका भाजीपाला यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्यामध्येपावसाळ्याचे दिवस असल्याने भाजीमंडईत चिखल, घाण साचलेली दिसत आहे. यासंदर्भात नागरिकांनी आ. मुटकुळे यांना माहिती दिली असता त्यांनी तत्काळ भाजीमंडईची पाहणी केली तसेच नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे लक्षात आल्यानंतर तत्काळ नगर पालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांना पाचारण करून स्वच्छता करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, प्रशांत सोनी, माजी नगरसेवक माबुद बागवान, हमीद प्यारेवाले, सदाशिव सुर्यतळ, शाम खंडेलवाल, उमेश गुठ्ठे, दिपक सेठी, संजय ढोके, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, दिनेश वर्मा यांची उपस्थिती होती.



**हिंगोली- राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे हे गुरूवारी हिंगोली दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली तसेच मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अतिरिक्त जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पोर्टलवरील त्रुटी दुर करण्याची प्रहारची मागणी

हिंगोली- शैक्षणिक सत्र सुरू असताना राज्यात सुरू असलेल्या शिक्षकांच्या ऑनलाईन जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेत पदस्थापना देताना पोर्टलला मंजूर पदांचा विचार न झाल्याने काही शाळेत मंजूर पदांपेक्षा जादा शिक्षकांना पदस्थापना दिली आहे. पदच उपलब्ध नसताना पदस्थापना देणे ही बाब अनियमित असून, ती दूर करावी, अशी मागणी प्रहार शिक्षक शिक्षक संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे. जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेत संवर्ग १ आणि संवर्ग २ ची बदली प्रक्रिया पूर्ण होऊन प्रसिद्ध झालेल्या बदली याद्यांमध्ये ही बाब निदर्शनास आली आहे. संबंधित शाळेत मंजूर पदांपेक्षा जादा पदस्थापना दिल्याने भविष्यात त्या शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न निर्माण होणार आहे आणि विनाकारण अतिरिक्त व्हावे लागणार आहे, हा यांच्यावर अन्याय होणार आहे. त्यामुळे आता पदस्थापना बदलून द्याव्यात आणि पुढील टप्प्यात मंजूर पदांपेक्षा जादा पदस्थापना होणार नाही.याची दक्षता शासनाने घ्यावी, अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदनावर प्रहार शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष किरण राठोड, आर पी जाधव, व्ही सी इंगोले, एन आर मार्कड, जी ए खिल्लारे, एस एन वानखेडे, जी एम झुंजारे आदींच्या सह्या आहेत.

### जिल्हा रूग्णालयात स्वच्छतेमुळे रूग्ण समाधानी



हिंगोली- येथील शासकीय जिल्हा रूग्णालयात मागील काही दिवसांपासून स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात येत असून रूग्णालय परिसर व वार्डातील सफाई कामगार उत्तम सेवा देत असल्यामुळे रूग्णालयाती रूग्णांसह नातेवाईक यांनी समाधान व्यक्त केले आहे. सदरील स्वच्छतेसाठी पुणे येथील स्मार्ट सर्व्हीसेस प्रायव्हेट लि. यांनी काम हाती घेतले असून मागील सहा महिन्यांपासून स्वच्छतेवर भर देण्यात येत आहे. त्यामुळे रूग्णालयात येणाऱ्या नागरिकांना तसेच रूग्णांच्या नातेवाईकांना सकारात्मक बदल झालेला दिसत आहे. एजन्सीने सोपविलेले काम व्यवस्थापक अरविंद वाढवे तसेच त्यांचे सहकारी दररोज करीत असल्याचे चित्र दिसत आहे.

### ८ ठिकाणी अवैधदारू विक्री अड्ड्यावर छापे

हिंगोली- दारूबंदी कायद्यांतर्गत हिंगोली पोलिसांनी बुधवारी जिल्ह्यातील ८ ठिकाणी अवैध दारूविक्री करणाऱ्यावर छापे मारले. आरोपींताकडून ९१०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत गुन्हे दाखल केले आहेत तसेच अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९५ वाहनचालकांविरूध्द कार्यवाही करीत ७६५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

## रस्ता खुला करून देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ७ ऑगस्ट**

औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे अनखळी येथील शेत गट क्रमांक ३०,३१,३२,३३,३४ व इतर गटातील रस्ता खुला करण्यासंदर्भात गुरुवारी(ता.०७) रोजी सकाळी ११ वाजता शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात निवेदन दिले आहे. सदरील निवेदन महसूल नायब तहसीलदार प्रवीण ऋषी यांनी स्वीकारले .शेतकरी प्रल्हाद तुकाराम गुट्टे व इतर शेतकऱ्यांनी अनखळी येथील शेती-गट क्रमांक३०,३१,३२,३३,३४ व इतर शेत गटातील रस्ता खुला करून देण्यासंदर्भात निवेदन दिले. या शेतगट क्रमांक मधून शेतकऱ्यांना शेतीची कामे व येजा करण्यासाठी रस्ता खुला करून देण्यासंदर्भात अनेक वेळा निवेदन दिले आहे. जो रस्ता पूर्वीपासून होता. त्यावर केलेले अतिक्रमण हटविणे परंतु वेळोवेळी निवेदन देऊनही प्रशासनाने कुठलीही कारवाई केली नाही. त्यामुळे आता दिलेल्या निवेदनाची प्रशासनाने दखल घेऊन रस्ता खुला करून द्यावा. अन्यथा १५ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करावे लागेल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. उपोषण दरम्यान जीवित्वास काही बरे वाईट झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील,असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे .या निवेदनावर शेतकरी प्रल्हाद तुकाराम गुट्टे यांची स्वाक्षरी आहे.

## राज्यातील ५ ज्योर्तिलिंग विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ ऑगस्ट**

राज्यातील पाच ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांची प्रभावी आणि वेगाने अंमलबजावणी व्हावी, यासाठी पाच वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी संबंधित ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांतील कामांचा नियमितपणे आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना सादर करतील. हिंगोली जिल्ह्यातील श्री. क्षेत्र औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा १५ कोटी २१ लाख रुपयांचा आहे. त्यामुळे औंढा नागनाथ तीर्थक्षेत्राचा विकास होणार आहे.

राज्यातील पाच ज्योतिर्लिंगांचा विकास करण्यासाठी आराखडे तयार करण्यात आले आहेत. या आराखड्यांची अंमलबजावणी वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने व्हावी याकरिता या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्योतिर्लिंग व त्यांच्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त अधिकारी पुढीलप्रमाणे - श्री क्षेत्र भीमाशंकर (जि.पुणे) - सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा., श्री. क्षेत्र घृष्णेश्र्वर (जि. छत्रपती संभाजीनगर) - उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी. श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) - वित्त विभागाचे प्रधान सचिव श्री. सौरभ विजय. श्री. क्षेत्र औंढा नागनाथ (जि. हिंगोली) - वित्त विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती रिचा बागला. श्री. क्षेत्र परळी वैजनाथ (जि. बीड) - इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव श्री. आप्पासाहेब धुळाज.

या पाच ज्योतिर्लिंगांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना उच्चाधिकारी समित्यांच्या बैठकांमध्ये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार वेळोवेळी शासन निर्णय देखील काढण्यात आले आहेत. त्यानुसार श्री. क्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील १४८ कोटी ३७ लाख रुपयांच्या सुमारे ११ कामांना मंजुरी देण्यात आली आहे. श्री-क्षेत्र घृष्णेश्र्वर तीर्थक्षेत्र विकास आराखडा १५६ कोटी ६३ लाख रुपयांचा आहे. श्री श्रेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखड्यातील २७५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. श्री. क्षेत्र औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा १५ कोटी २१ लाख रुपयांचा आहे. तर श्री श्रेत्र परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील २८६ कोटी ६८ लाख रुपयांच्या ९२ कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील विविध कामांना गती मिळावी, ही कामे दर्जेदार आणि गतीने व्हावीत, यासाठी संबंधित अधिकारी समन्वय साधणार आहेत. अशा पद्धतीने विकास आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी मंत्रालयीन स्तरावरून समन्वय, संनियंत्रणासाठी अधिकारी नियुक्तीचा निर्णय पहिल्यांदाच घेण्यात आला आहे.

## पार्थिव शिवलिंग पूजनाला शिवभक्तांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ ऑगस्ट**

आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती एनटीसी हिंगोली व सद्गुरु सेवा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने एनटीसी येथील छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसरात पार्थिव शिवलिंग पूजनाचा कार्यक्रम मोठ्या भक्ती भावात हजारोंच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाला गांगलवाडी येथील सिद्धनाथ संस्थानचे गुरुवर्य परमपूज्य आत्मानंद महाराज व खडेश्वर संस्थान खटकाळी हिंगोलीचे परमपूज्य सुमेरपुरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. त्या दोन्ही गुरुवर्यांचा सत्कार आयोजक उत्सव समितीचे अध्यक्ष कल्याण देशमुख व सद्गुरु प्रतिष्ठानचे लक्ष्मीकांत पाठक महाराज यांनी केला. पार्थिव शिवलिंग पूजना अगोदर गायक तुकाराम जाधव, संस्कृती पिंगळकर यांच्या समवेत अथर्व देशमुख, अनिरुद्ध पांडे, तेजस रत्नपारखी यांनी भजन व भक्ती गीते सादर केली यानंतर मुख्य सोहळा पार्थिव शिवलिंग पूजन संपन्न झाले .पार्थिव शिवलिंग पूजन कार्यक्रम यशस्वीतेसाठी वंदनाताई भुसांडे, अनिता शिंदे, ज्योती कान्हे, कावेरी रोडगे, योगिता देशमुख, कुंजना टाक, राधा बियाणी, छाया मगर, योगिता जोशी, राखी झंवर, दिपाली घन, दीपा भक्कड, स्वाती जोशी, संध्या देशमुख, सविता चक्रवार, संगीता मामडे, शिल्पा नरसीकर, दिपाली पोहेकर घण, संगीता निलावार, पूजा पारस्कर, मृणालिनी पत्की, कु. सपना राऊत, कु. वैष्णवी खेत्रे, कु. सायली इंगळे, कु. अंकिता पवार, कु. शितल झाडे, कु. श्रद्धा चौतमल, कु. प्रीयल देशमुख, कु. साक्षी दवणे, कु. श्रुती देशपांडे यांच्यासह महिला संयोजन समितीने परिश्रम घेतले. यावेळी गुरुवर्य महाराज धोंडीराज पाठक, नागेश पाठक दारेफळकर हजारो भावी भक्त कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## प्रश्न मंजुषामध्ये शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयाचे यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ७ ऑगस्ट**

येथील शासकीय जिल्हा रूग्णालयात आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन कर्ण्यात आले होते. या स्पर्धे भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलीत श्रीमती शांताबाई मुंजाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. या स्पर्धेत विविध शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते परंतु शांताबाई दराडे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले असून त्यामध्ये अनुक्रमे शुभम कानडे, देवेश कांबळे, श्रध्दा वानखेडे यांचा समावेश आहे. या यशानंतर जिल्हा सामान्य रूग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ दिपक मोरे, संजय पवार, श्रीमती कुंदनानी यांनी त्यांचा सन्मानचिन्ह, रोख रक्कम तसेच पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आहे. यासाठी शिक्षक मिलींद पाठक, रवींद्र जांभळे, सुप्रिया यरमळ, जयश्री धुमाळ यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक डॉ पी एस अंभोरे यांनी अभिनंदन केले आहे.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तेर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.७ ऑगस्ट -**

महसूल विभागाच्या वतीने धाराशिव तालुक्यातील तेर येथे (दि.६) आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान' आयोजित करण्यात आला होता.

प्रशासनाच्या वतीने आयोजित या समाधान शिबिरात नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवण्यात आल्या, ज्यात फार्मर आय.डी.



नोंदणी, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जातीय प्रमाणपत्र, रेशन कार्ड के. वाय.सी. श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, वृद्धापकाळ योजना आणि डी.बी.टी. (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) के.वाय.सी. यांसारख्या महत्त्वाच्या कामांचा समावेश होता.

यावेळी सरपंच दीदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, महसूल मंडळ अधिकारी शरद पवार, तेरचे तलाठी प्रशांत देशमुख, तगर अभ्यासक रेवणसिद्ध लामतुरे, रवीराज चौगुले, नवनाथ नाईकवाडी, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब खोचरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...



### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे जिल्हा प्रशासनाकडून स्वागत

**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे ७ ऑगस्ट रोजी आगमन प्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक शफकत आमना, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी सर्वश्री शिरीष यादव, संतोष राऊत,अरुणा गायकवाड,जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे,धाराशिव उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार मृणाल जाधव यांचेसह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय ११ ऑगस्टला निवड चाचणी

**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

World School Volleyball (U-15 Boys Girls) Championship ही आंतरराष्ट्रीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा आंतरराष्ट्रीय शालेय खेळ महासंघाद्वारे आयोजित करण्यात येत आहे.यामध्ये सहभागी होणाऱ्या भारतीय व्हॉलीबॉल संघाच्या निवडीसाठी भारतीय शालेय खेळ महासंघाने राष्ट्रीय निवड चाचणी दि. २५ ते ३० ऑगस्ट २०२५ या कालावधीत श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे-बालेवाडी,पुणे येथे आयोजित केली आहे. या राष्ट्रीय चाचणीसाठी महाराष्ट्र राज्यातून निवड झालेल्या खेळाडूंना सहभागी होता यावे,यासाठी राज्यस्तरीय निवड चाचणी ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात पुण्यात होणार आहे.त्यासाठी आधी विभागीय निवड चाचणी १४ ऑगस्टपूर्वी घेण्यात येणार असून प्रत्येक विभागातून ५ मुले व ५ मुलींची निवड केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर,धाराशिव जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी हायस्कूल,धाराशिव येथे करण्यात आले आहे.चाचणीत सहभागी होणाऱ्या खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २०१० ते ३१ डिसेंबर २०१३ या दरम्यान असावा. जिल्ह्यातील सर्व शाळांनी आपल्या शाळेतील २ उत्कृष्ट खेळाडूंना आवश्यक कागदपत्रांसह पाठवावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.



### स्पेलिंग बी बीट स्तरीय स्पर्धेचे आयोजन

**तेर, दि.७ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळेत तेर येथे SPELLING BEE COMPITITION बीट स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत दोन गटात बीट स्तरावरील विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. तेर येथील पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू शाळेतील पहिल्या गटात दोन आणि दुसऱ्या गटात दोन विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांपैकी कोरबू नमीरा अन्सार इयत्ता आठवी या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक पटकावले आहे. बीट स्तरावरील यशस्वी विद्यार्थ्यांना तालुकास्तरावर स्पर्धे साठी पाठवण्यात येणार आहे. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी नमिराचे कौतुक करत शाबासकी दिली. तसेच इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षिका खतीब मुमताज यांचेही अभिनंदन करण्यात आले.



### वीज पडून गायीचा मृत्यू, शेतकऱ्याचे नुकसान

**नळदुर्ग, दि.७ ऑगस्ट -**

सिंदगाव ता. तुळजापुर येथे दि.७ जुलै रोजी विजांच्या कडकडाटासह झालेल्या पावसात गायीवर वीज पडल्याने गायीचा मृत्यु होण्याची घटना घडली आहे. दि. २ जुलै रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास सिंदगाव येथे ढगांचा गडगडाट व विजांच्या कडकडाटासह कांही वेळ जोरदार पाऊस झाला. या पावसातच राजेंद्र अमृतराव पाटील यांच्या गट नं.१०३ मधील शेतात झाडाला बांधलेल्या गायीवरच थेट वीज कोसळली यामध्ये गायीचा मृत्यु झाला आहे. दुभती गाय मरण पावल्याने राजेंद्र पाटील यांचे नुकसान झाले आहे.

# सत्कारामागे आ.राणादादांच्या प्रयत्नांचा सन्मान की गुत्तेदारीचा डाव?

**तुळजापूरात नागरी सत्काराच्या आयोजनावरून राजकीय चर्चांना उधाण...तुळजापूर विकास आराखड्यातील हिस्स्यासाठी 'सत्काराचा घाट'?...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

तुळजापूर शहराच्या आणि परिसराच्या विकास आराखड्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या तब्बल १८६६ कोटी रुपयांच्या निधीच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा नागरी सत्कार मोठ्या थाटामाटात पार पडला. मात्र, या सत्कारामागील उद्देशावर आता विविध वर्तुळांतून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत - हा खरोखरच त्यांच्या प्रयत्नांचा सन्मान होता, की मंजूर निधीत आपली गुत्तेदारी शाबूत ठेवण्याचा राजकीय डाव? अशी चर्चा सध्या तुळजापूरसह जिल्हाभरात सुरू आहे.

सत्कार समारंभात स्थानिक व्यापारी, माजी नगरसेवक, पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध संघटनांनी आमदार पाटील यांचे विकासकामांसाठी कौतुक केले. या सत्कार कार्यक्रमाची वेळ आणि पद्धत ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकपूर्व राजकीय समीकरणांच्या अनुषंगाने पाहावी लागेल.

याच पार्श्वभूमीवर विकास आराखड्यातून स्वतःची भूमिका स्पष्ट करण्यासाठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठी सत्काराचा कार्यक्रम आखण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

आ. राणाजगजितसिंह पाटील हे तुळजापूर तालुक्यातील प्रभावी नेते असून, अनेक वर्षांपासून राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यांनी हा निधी तुळजापूरच्या सर्वांगीण विकासासाठी आहे आणि त्यासाठी कोणतीही राजकीय मतभेद आड येऊ दिली जाणार नाहीत. असे स्पष्ट केले असले तरी या निधीतून कोणत्या ठेकेदारांना प्राधान्य दिले जाणार? कामांचे टेंडर कसे काढले जातील? आणि त्यामागे कोणाची गुत्तेदारी आहे? याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याचेही बोलले जात आहे.

तुळजापूर येथे नुकताच आ.राणाजगजितसिंह पाटील यांचा मोठ्या थाटात नागरी सत्कार करण्यात आला. मात्र या सत्काराम‍ागे खऱ्या अर्थाने त्यांच्या कामाचा गौरव होता की १ हजार ८६६ कोटींच्या विकास आराखड्यातील ठेके मिळवण्यासाठीचा राजकीय प्रयत्न, असा गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

### निवडणुकीतील नाराजी, आता गटबाजीतून पूर्तता?

लोकसभा निवडणुकीत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील या महायुतीच्या उमेदवार होत्या. मात्र तुळजापूर शहरामधून त्या अपेक्षित मताधिक्य मिळवू शकल्या नव्हत्या. त्या निवडणुकीत आमदारांच्या निकटवर्तीयांपैकीच काही जणांनी आतून विरोध केल्याचे सांगितले जाते. इतकेच नव्हे, या मंडळींमधील काही जणांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरंगे पाटील यांची भेट घेऊन अर्चनाताईंविरोधात मतविभाजनाचे षडयंत्र आखले होते, अशी चर्चा शहरात आता जोर धरत आहे.

### सत्काराच्या आड चाललेला हिस्स्याचा डाव?

तुळजापूरच्या विकास आराखड्यात राज्य शासनाने तब्बल १८६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून शहराचा सर्वांगीण विकास होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, सत्ताधाऱ्यांच्या जवळीक असलेल्या काही ठेकेदार, राजकीय कार्यकर्ते आणि स्वघोषित विकास सेवकांना या कामांमध्ये स्वतःचा हिस्सा पक्का करायचा आहे. अशाच मंडळींनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा सत्कार करण्याचा घाट घातल्याचे बोलले जात आहे. यामागे त्यांचा उद्देश हा आमदारांना खुश ठेवून पुढील टेंडर वाटपाच्या प्रक्रियेत आपली उपस्थिती सुनिश्चित करण्याचा असल्याचे राजकीय वर्तुळात सांगितले जात आहे.

### ड्रग्स प्रकरणातील निमंत्रित आणि राजकीय पाठिंबा?

सत्कार समारंभात निमंत्रित असलेल्या एका व्यक्तीवर तुळजापूरमधील ड्रग्स प्रकरणात आरोप आहेत. ही बाब सार्वजनिक झाल्यानंतर जनतेमध्ये तीव्र संताप पसरला आहे. अशा व्यक्तींना सार्वजनिक व्यासपीठावर स्थान दिले जाते हे धक्कादायक आहे, असे मत काही समाजप्रबोधन करणाऱ्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. या प्रकरणात महसूल मंत्री बावनकुळे आणि आमदार पाटील यांचा छुपा राजकीय पाठिंबा असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. कारण, संबंधित प्रकरणांवर अजूनही ठोस कारवाई झालेली नाही.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सत्कार सोहळ्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. निमंत्रितांच्या यादीत एका अशा व्यक्तीचेही नाव आहे. ज्याच्यावर तुळजापूर ड्रग्स प्रकरणात गंभीर आरोप आहेत. हा व्यक्ती सार्वजनिक व्यासपीठावर सन्मानित होतो, यावरून या प्रकरणात उच्चस्तरीय पाठिंबा असल्याचीही कुजबुज सुरू झाली आहे. सध्या तुळजापूर शहरात विकास आराखड्याच्या नावाखाली विविध प्रकारच्या योजनेची घोषणा केली जात आहे. मात्र या योजना प्रत्यक्षात राबवताना कोणाचा हिस्सा किती? याचे राजकारण सुरू आहे. या पार्श्वभूमीवरच हा सत्कार सोहळा घडवून आणला गेला आहे, अशी चर्चा आहे. सत्कार कार्यक्रमासाठी निमंत्रितांची यादी सोशल मीडियावर व्हायरल झाली असून, त्यावर नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. विकासाच्या नावाखाली स्वार्थसिद्धी चालली आहे, ड्रग्स आरोपींचा सन्मान सुरू असेल तर काय उपयोग विकास आराखड्याचा? अशा शब्दांत संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

## समर्पित जीवन अर्पण करणारे सुभाष सूर्यवंशी गुरुजींचे निधन; मरणोत्तर देहदानाचा संकल्प पूर्णत्वास

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.७ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील चिवरी येथील सेवानिवृत्त शिक्षक तथा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण जीवन समर्पित करणारे खरेखुरे हाडाचे शिक्षक एवढेच नव्हे तर बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले याची खरी प्रचिती आज पहावयास मिळाली. गुरुजी हयात असतानाच देहदानाची संकल्पना आज खऱ्या अर्थाने पूर्ण झाली असली तरी गुरुजींच्या जाण्याने शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात कायमची पोकळी निर्माण झाली हे मात्र विसरता येणार नाही.



आदर्श शिक्षक आदरणीय स्व. सुभाष काशिनाथ सूर्यवंशी यांचे प्रदीर्घ आजाराने आज दि.७ रोजी सकाळी निधन झाले. निधनापूर्वी हयात असतानाच त्यांनी देह दानाची संकल्पना केली होती. हा संकल्प आज गुरुजींच्या इच्छेप्रमाणे त्यांचे पार्थिव धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले. जेणेकरून त्यांच्या शरीरातील अवयव इतरांच्या जीवनात नवसंजीवनी निर्माण करू शकतील. गुरुजींचा हा आदर्श निश्चितच प्रेरणादायी व दिशा देणारा ठरेल. अणदूर परिसरात मरणोत्तर देहदान ही संकल्पना पहिल्यांदाच घडली असून त्यांच्या या ठाम निर्णयाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे,त्यांच्या या मरणोत्तर देहदान संकल्पनेला त्यांचे जिवलग मित्र डॉ. अशोक चिंचोले यांनी ते पूर्ण होण्यासाठी मदत केली.

मरावे परी कीर्ती रूपे उरावे या उक्तीप्रमाणे गुरुजी अखंड विद्यार्थी व समाजासाठी तन -मन -धनाने काम करत असत. शिक्षणापासून वंचित असलेल्या निराधार साठी तर ते दैवतच होते. संपूर्ण जीवन तळागाळातील, वंचिता साठे खऱ्या अर्थाने समर्पित केले.

शेवटी आपल्या देहाचे देहदान करून अमर झाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अणदूर येथील जयमल्हार पत्रकार संघाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे.

**धाराशिव :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे दोन मरणोत्तर देहदान झाले. पहिले देहदान कै.सुभाष काशिनाथ सुर्यवंशी (वय ७५, सेवानिवृत्त शिक्षक) यांचे असून, त्यांच्या दोन मुलांनी - संतोष आणि नितीन - जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान,श्रीक्षेत्र नानीजधाम (ता.जि.रत्नागिरी) यांच्या प्रेरणेने हे निर्णय घेतला. दुसरे देहदान कै.श्रीमती सिताबाई बाबुराव रानदिवे (वय७०) यांचे असून,त्यांच्या चुलत नातू दत्ता रानदिवे व गावातील उपसरपंच सतीश खराटे यांच्या प्रेरणेतून हे कार्य घडले.

## डॉ.आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेत सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

डॉ.आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्था, रुईभर येथे सौर ऊर्जा प्रकल्पाचा मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ मोठ्या थाटात झाला.

संस्थेने सौर ऊर्जा प्रकल्प १५ घथ बसवला आहे. ग्रामीण भागात हा नवीन उपक्रम राबवून संस्थेने विकास भर घातली आहे. विजेचे भरमसाठ विज बिल भरावे लागत असत. प्रत्येक महिन्याला २५ ते ३० हजार रुपये बिल येत असे. या प्रकल्पामुळे वीज बिलाची बचत होऊन संस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे.

विद्यार्थ्यांना आणखी सुविधा पुरवण्यास मदत होणार आहे. प्रत्येक विषयाचे ई-लर्निंग अध्यापन करण्यात हातभार लागणार आहे. ई लर्निंग अध्यापन आणखी प्रभावी राबवले जाईल. वस्तीग्रहातील मुला- मुलींनाही याचा फायदा होणार आहे.

या अगोदरच वॉटर सोलर बसवून संस्थेने वसतीगृहातील विद्यार्थ्यांना गरम पाण्याची सुविधा करून दिली आहे.

डॉ.आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थे-अंतर्गत जयप्रकाश विद्यालय, इंदिरा गांधी प्राथमिक शाळा, श्री स्वामी समर्थ कला विज्ञान महाविद्यालय, जिजामाता मुलींचे वस्तीगृह, जय श्रीराम मुलांचे वस्तीगृह, जनाबाई तुळशीदास जाधव वस्तीगृह या सर्व शाखांना याचा फायदा होणार आहे.

याप्रसंगी डॉ.आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, माजी जि.प.सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा प.सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके,

श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकारली नागरिकांची निवेदने; नागरिकांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

महसूलमंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज ७ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात नागरिकांची निवेदने स्वीकारली व प्राप्त निवेदनातून नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक शफकत आमना,



अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, संतोष राऊत, अरुणा गायकवाड, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, संजय पाटील यांच्यासह सर्व तहसीलदार तसेच भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

महसूलमंत्री श्री.बावनकुळे म्हणाले की,आजच्या या कार्यक्रमातून नागरिकांची जी निवेदने प्राप्त झाली आहे,त्या सर्व निवेदनावर कार्यवाही करण्यात येईल.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले ४८ तासाच्या आत देण्यात यावीत. गायरान जमिनीच्या तसेच पवन ऊर्जा कंपन्यांच्या प्रश्नांबाबत लवकर बैठक लावण्यात येईल.असे श्री.बावनकुळे यांनी यावेळी सांगितले. यावेळी महसूल, भूमी अभिलेख, खनिकर्म तसेच विविध विभागाशी संबंधीत ३५० पेक्षा जास्त निवेदने प्राप्त झाली.

# पार्वती मल्टीस्टेट : खातेदाराचे २४ ऑगस्टपर्यंत पैसे परत द्या अन्यथा २५ ऑगस्टला राष्ट्रीय महामार्ग रोखणार

## शेतकरी नेते अनिल जगताप यांची जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील धरणे आंदोलनात घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑगस्ट -**

पार्वती मल्टीस्टेट बँकेच्या हवालदिल झालेल्या ठेवीदाराने अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रचंड आक्रमक होत व घोषणाबाजी करत धरणे आंदोलन केले. न्यायालयीन मार्गाबरोबरच रस्त्यावरची लढाई देखील अनिल जगताप यांच्या नेतृत्वात खातेदारांनी सुरू केलेली आहे. पार्वती मल्टीस्टेट बँकेत मुद्दल व व्याज मिळून जवळपास साडेतीनशे ते चारशे खातेदारांचे २५ कोटी रुपये पेक्षा जास्त रक्कम अडकली आहे त्यामुळे खातेदार हवालदिल झाले आहेत.

ईडी, गृह ,सहकार आणि अर्थ या खात्याकडे स्वतंत्र चार याचिका गेल्या आठवड्यातच अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदाराने मुंबई येथे दाखल केल्यानंतर आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. पुढील आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात दोन स्वतंत्र याचिका देखील दाखल करण्यात येणार आहेत . आजच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या धरणे आंदोलनात ठेवीदारांनी आपल्या व्यथा मांडल्या तसेच आक्रोश देखील पाहायला मिळाला बँकेत ठेवी अडकलेल्या खातेदारांमध्ये विधवा, महिला अपंग तसेच देशाच्या रक्षण करणाऱ्या जवानाचा देखील समावेश आहे. पोटाला पीळ मारून रुपया रुपया जमा केलेल्या खातेदारांचा प्रचंड आक्रोश आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बघायला मिळाला. आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जनता दरबार असल्याने



प्रचंड गर्दी या ठिकाणी झालेली होती. सर्वच खातेदारांनी अनिल जगताप जो निर्णय घेतील ते मान्य असेल असं म्हणत अनिल दादा जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला. जगताप यांनी त्यांच्या भाषणात ठेवीदाराचे पैसे जर बँकेने २४ ऑगस्ट पर्यंत नाही दिले तर २५ ऑगस्टला आष्टा मोड तालुका लोहारा येथील राष्ट्रीय महामार्ग अडवण्याची घोषणा केली खातेदारांनी प्रचंड टाळ्या व घोषणा देत या गोष्टीचे समर्थन केलं.

अनिल जगताप यांच्यासोबत बँकेच्या खातेदारांनी जाऊन जिल्हाधिकारी श्री किर्ती किरणपूजा यांना निवेदन दिले. तसेच आज धरणे आंदोलन केल्याची माहिती दिली. जिल्हाधिकारी महोदयांनी खातेदारांना सांगितले की या गोष्टीवर मी यापूर्वीच बारीक नजर ठेवून असून कालच मी जिल्हा उपनिबंधक धाराशिव यांना या संदर्भात सूचित केले आहे येत्या सोमवारी उपनिबंधक बँकेचे संचालक मंडळ खातेदार ईडीचे अधिकारी व सर्व संबंधित यंत्रणा यांची बैठक कुठल्या दिवशी घ्यायची याचा निर्णय करू असे सांगितले. सोमवारी जिल्हाधिकारी यांच्याकडून बैठकीची तारीख मिळाल्यानंतर बैठकीत काय तोडगा निघेल याविषयी आता खातेदारांमध्ये उत्सुकता वाढली आहे मात्र अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली खातेदार आता संघटित झाले असून दोन वर्षांपासून कोट्यावधी रुपयांच्या ठेवी बँकेत अडकले आहेत त्या मिळण्याची आशा निर्माण झालेली आहे निवेदनामध्ये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करा संचालकाची मालमत्ता जप्त करा जे संचालक गुन्हा करून बाहेर फिरत आहेत त्यांना तातडीने अटक करा अशा मागण्या करण्यात आल्या..आजच्या या धरणे आंदोलनामध्ये खातेदार महिलांनी देखील उत्स्फूर्त सहभाग घेऊन घोषणा दिल्या.

# खालिद का शिवाजी या चित्रपटावर बंदीसाठी भाजप प्रदेशाध्यक्षांकडे मागणी

## माजलगाव भाजपने दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ ऑगस्ट**

नुकताच प्रदर्शित होऊ घातलेला खालिद का शिवाजी या चित्रपटावर बंदी घालण्यासाठी भारतीय जनता पक्ष माजलगाव ने प्रदेशाध्यक्ष भाजप श्री रवींद्र चव्हाण यांना मुंबई येथे मागणीचे निवेदन दिले.



खालिद का शिवाजी नावाचा चित्रपट नुकताच प्रदर्शनाच्या वाटेवर आहे या चित्रपटाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास दाखवून तो समाजात प्रसारित करण्याचा दिग्दर्शकाचा डाव आहे या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर मशीद उभारली त्यांच्या सैन्यात पस्तीस टक्के मुस्लिम होते यासारखी इतिहासात कुठेही नोंद नसलेली माहिती चित्रपटावरून समाजात बिंबवनाच्या चित्रपट निर्मात्याचा डाव आहे हा चित्रपट प्रदर्शित झाल्यास तो छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान ठरेल याकरता राज्य शासनाने त्वरित या चित्रपटाच्या प्रदर्शनावरती बंदी घालून युट्युब वरती त्यांचा प्रसिद्ध झालेल्या ट्रेलर वरती ही बंदी घालावी अशी मागणी आज भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्याकडे माजलगाव भाजप अध्यक्ष विनायक रत्नपारखी सरचिटणीस पवन मोगरेकर, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सोमेश दहिवाळ भाजप सोशल मीडिया राज्य सदस्य दत्ता महाजन यांनी केली यावेळी प्रदेशाध्यक्षांसोबत झालेल्या चर्चेत सदरील चित्रपट प्रदर्शित झाल्यास महाराजांचा चुकीचा इतिहास समाज मनावर बिंबवला जाईल चित्रपटातील चुकीच्या संदर्भामुळे तो छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान ठरेल. याकरिता प्रवेशाध्यक्षांनी राज्य सरकारकडे चित्रपटावर बंदी घालण्यासाठी मागणी करावी अशा आशयाचे निवेदन त्यांना देण्यात आले याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष श्री रवींद्र चव्हाण यांनी राज्य सरकारकडे याबाबत योग्य बाजू मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# केंद्राच्या योजनेतून बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी मंजूर

## खा.बजरंग सोनवणे यांचे प्रयत्न फळाला, केजला दिले झुकते माप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑगस्ट :**

पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारती मंजुर करण्यात आलेल्या असून नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधण्यात येणार आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला असून आता या पाठपुराव्यामुळे गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे.

केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेचे पुनर्गठन करुन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ या कालावधीत राबविली आहे. सदर योजनेचा मुळ ढाचा न बदलता सन २०२२-२३ पासून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना ग्रामविकास विभागाच्या निर्णयान्वये लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०टक्के व राज्य हिस्सा ४०टक्के असे आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजनेसाठी वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनांनुसार ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि त्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली मंजूर करण्यासाठी पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींकरीता नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामास मंजूर करण्यात आले आहे. यात केज तालुक्याला झुकते माप दिले असून २८ पैकी ४ इमारती या केज तालुक्यातील आहेत.



केंद्राकडे पाठविले प्रस्ताव

उद्दिष्टाच्या अधीन राहून ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ३००० पेक्षा अधिक आहे आणि त्यांना स्वमालकीची ग्रामपंचायत इमारत नाही, अथवा धोकादायक व मोडकळीस आलेली आहे, अशा ग्रामपंचायतींचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केंद्र शासनाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिल्या होत्या.

या ग्रामपंचायतींचा समावेश

धोंडराई, नित्रूड, आडस, टाकरवण, जातेगाव, होळ, जिरेवाडी, बनसारोळा, बंगाली पिंपळगाव, मानूर, मोरेवाडी, तेलगाव, कोळगाव, जाटनांदूर, जवळगाव, सायगाव, सौताडा, मोगरा, आष्टा ह.ना., पाली, यूसफवडगाव, चेनई, केसापुरी, दादेगाव, पुस, गढी,पिंपळनेर, तिंतरवणी.



महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे धाराशिव प्रवासा दरम्यान बीड येथे काही वेळ थांबले यावेळी ना.पंकजाताई मुंडे व जिल्हा भाजपचे वतीने सत्कार जिल्हाध्यक्ष शंकररावजी देशमुख यांनी केला यावेळी विक्रांत हजारी सुनील मिसाळ अदित्य सारडा शांतीनाथ डोरले श्रीकांत सानप ॲड.उद्धव रासकर बालाजी पवार अमोल वडतीले महादेव नागरगोजे सदाशिव वनवे केशव बडे आदी पदाधिकारी उपस्थित होते

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात पाच हजार वृक्षांची लागवड

## सोळंके महाविद्यालय व नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ ऑगस्ट**

सुंदरराव सोळंके महाविद्यालय व नगर परिषद माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या परिसरात दिनांक ७ ऑगस्ट रोजी पाच हजार झाडांची लागवड करण्यात आली.



सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ' एक पेड मां के नाम २.०' योजने अंतर्गत व महाराष्ट्र शासनाच्या 'हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र,झाडे लावूया प्रदूषण मुक्त भारत बनवूया या' योजनेअंतर्गत नगर परिषद माजलगाव व सुंदरराव सोळंके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या परिसरात जवळपास ५००० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणा दरम्यान विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, नगर परिषदचे मुख्याधिकारी पोपट निघळ, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड, प्रबंधक प्रशांत चव्हाण, के. बी.भोंडवे, एकनाथ मस्के,न.प चे विघ्नेश मुंडे,शिवहर शेटे,आयुब पठाण, अजय मुंडे, विशाल टाकणखार, अक्षय धारक यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच नगरपरिषद कर्मचारी , महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनी यांनी वृक्षारोपणामध्ये सक्रिय सहभाग घेऊन वृक्षारोपण केले. यावेळी वृक्षारोपण केलेल्या झाडांचे संगोपन करून झाडे वाढविण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.

# हरी नामाने अवघी गोरक्षनाथ टेकडी दुमदुमली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑगस्ट**

महान संत किसन बाबा महाराज, गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्यावर भाविकांचे अफाटनिष्ठा आणि श्रद्धा आहे या निष्ठेमुळेच गोरक्षनाथ टेकडीचे वैभव टिकून असल्याचे गौरव उद्गार शंकर महाराज शेवाळे यांनी काढले.



विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये सोमवार सायंकाळी कीर्तन सेवा ह.भ.प.शंकर महाराज शेवाळे यांनी समर्पित करताना संत निळोबा महाराज यांचा धन्य त्यांची तयां माय प्रसवली ।
ज्यांची निष्ठा जडली विठ्ठल रुपीं ।।१।।
विठ्ठल आसनीं विठ्ठल भोजनीं ।
विठ्ठल शयनीं न विसंबती ।।२।।
त्यांचे सर्व काम पूर्ण मनोरथ ।
करिल हा नाथ पंढरिचा ।।३।।
निळा म्हणे ज्यांचा हेत पांडुरंगीं ।
रंगले ते जगीं धन्य जाले ।।४।।
अभंग घेतला याचे विवेचन करताना पांडुरंगावर निष्ठा असावी जाळी स्थळी काष्ठी पाषाणी सर्वत्र पांडुरंग दिसावा संत निळोबा महाराज यांनी पांडुरंगावर अनंत निष्ठा ठेवली तशी निष्ठा सर्वांनी गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या चरणी असावी गुरू नवनाथ बाबा यांनी आपली निष्ठा गुरू किसनबाबा यांच्या प्रति समर्पित केली हिच निष्ठा गुरू किसनबाबा महाराज यांनी गुरू साधू बाबा महाराज यांच्या प्रति समर्पित केली म्हणून आज गोरक्षनाथ टेकडीच वैभव जे दिसत आहे ते फक्त गुरू किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या प्रति तुम्हा भाविक भक्तांच्या निष्ठा आहे, म्हणून आज हे वैभव गुरु निष्ठेचा प्रसाद आहे, असे संत निळोबा महाराज यांच्या अभंगाचे विवेचन करताना संत निळोबा महाराज यांना पांडुरंग उठता, बसता, जेवताना, झोपताना सर्वत्र पांडुरंग दिसत आहे. त्याचे सर्व मनोरथ पादुरंग पूर्ण करत आहेत तस तुमची निष्ठा गुरू नवनाथ बाबा महाराज व गुरू किसन बाबा महाराज यांच्या प्रति राहू द्या तुमचे सर्व मनोरथ पादुरंग पूर्ण करेल, असे प्रतिपादन शंकर महाराज शेवाळे यांनी कीर्तनात केले त्यांना मृदुंगवादन साथ अरुण महाराज कदम व बाजीराव महाराज काळे यांनी दिली. या कीर्तनात कीर्तनसाथ बाळासाहेब महाराज मोरे व उत्तरेश्वर महाराज पुरभे यांनी दिली सोमवारी प्रवचन सेवा अच्युत महाराज रेडे यांनी केले. अभंगवाणी टेकडी गायक वादक मंडळी यांनी केले. तसेच सोमवारी रात्री हरिजागर करण्यात आला . कीर्तन प्रवचन अभंगवाणी हरी जागर याला भाविक भक्तांची अलोट गर्दी होत आहे. हरिपाठ, गाथा पूजन, प्रवचन, कीर्तन, अभंगवाणी, हरी जागर अशा हरी नामाने अवघी गोरक्षनाथ टेकडी दुमदुमली आहे

# दुसऱ्या श्रावण सोमवारी ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथाच्या दर्शनाला भाविकांची गर्दी

**प्रभू वैद्यनाथाच्या मंदिरात फुलांची सुंदर आरासने भाविकांचे लक्ष वेधले**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.७ ऑगस्ट**

'हर हर महादेव, वैद्यनाथ महाराज की जय...चा जयघोष करत दुसर्या श्रावण सोमवारी ४ ऑगस्ट रोजी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी शिवभक्तांचा जनसागर उसळला. दुपारपर्यंत एक लाखांवर भाविकांनी दर्शन घेतले. पहिल्या श्रावण सोमवारांच्या तुलनेत आज भाविकांची मोठी गर्दी होती. शिवाय दररोज श्रावणानिमित्त दर्शन घेणार्या भाविकांची संख्या मोठी आहे.मंत्री पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांनी घेतले श्रींचे दर्शन घेतले.



दुसर्या श्रावणी सोमवारनिमित्त पहाटे काकडा आरती, अभिषेक पूजा होवून दर्शनाला सुरूवात झाली. दर्शनासाठी स्त्री, पुरूष भाविकांसाठी वेगवेगळ्या रांगा होत्या. दर्शन व्यवस्थेचे काम चोख व्हावे व भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून श्री वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव प्रा बाबासाहेब देशमुख व त्यांचे सहकारी, कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

अनेक भाविकांनी दर्शन घेण्याबरोबरच वैद्यनाथ प्रभूची रूद्राभिषेक पूजाही केली. दुसर्या श्रावणी सोमवारनिमित्त बेल, फुल, श्रीफळ भाविकांनी 'श्री'स अर्पण केले. शिवाय तीळाची शिवमुठही अर्पण केली. मंदिराकडे जाणार्या रस्त्यावर बेल, फुल, प्रसादाची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली होती. अनेक गंगाखेड व परिसरातून भाविक पायी चालत येवून श्रावणात दररोज गंगेचे जलअर्पण करून पूजा करतात. त्यास 'वैद्यनाथाची कावड' असे म्हणतात. दर्शन व्यवस्था चोख व्हावी यासाठी सी.सी.टी.व्ही.कॅमेर्याद्वारे संपूर्ण दर्शन व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यात आले होते. परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त मंदिर परिसरात तैनात करण्यात आला होता.

प्रभू वैद्यनाथाच्या मंदिरात फुलांची सुंदर आरास

श्रावणातील दुसऱ्या सोमवारी परळीतील प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केलीय. यानिमित्त मंदिरात आकर्षक अशा विविध रंगांच्या फुलांची आरास करण्यात आली असून यात झेंडूसह गुलाब, मोगरा अशा विविध फुलांची सुंदर आरास करून परिसर भक्तिमय झालाय.ही आरास करण्यासाठी खास हैदराबादहून फुलं आणण्यात आली आहेत. आकर्षक फुलांची सजावट पाहून भाविकांच्या डोळ्याचे पारणे फेडत आहे.

यावेळी दर्शनासाठी मोठंमोठ्या रांगा बघायला मिळाल्या. श्रावणातील दुसरा सोमवार असल्याने दिवसभर भाविकांची गर्दी वाढण्याची शक्यता देखील आहे.

# भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी बससेवा सुरू

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ ऑगस्ट**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनींना, विद्यार्थ्यांना बाहेरगावाहून शाळेत येण्यासाठी गेवराई आगाराच्या वतीने बससेवा सुरू करण्यात आली आहे.

कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनींना रांजणी, बर्हाणपूर, आहेर वाहेगांव, हिरापूर, टाकळगांव, कानडा पिंपळगांव, पारगांव जप्ती, नांदूर हवेली, खामगांव, कुंभारवाडी, कृष्णानगर, ईटकूर, शिंपेगांव या गावातील विद्यार्थी, विद्यार्थीनींना शाळेत येण्या-जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ गेवराई आगाराच्या वतीने बुधवार दि.०६ पासून नियमित बससेवा सुरू करण्यात आली आहे. बससेवा सुरू करण्यासाठी आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीय सहाय्यक गिरीष देशपांडे, सतीश बहीर , प्राचार्य थिटे ए. एस. यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला.नियमित बससेवा सुरू केल्याबद्दल गेवराई आगाराचे आगारप्रमुख एल. बी. म्हस्के, सहाय्यक वाहतूक अधिक्षक कालिके टी. डी., वाहतूक निरीक्षक प्रदिप तागड, बसचालक निशिकांत शिंदे, वाहक सुयोग दाभाडे यांचे कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी स्वागत केले. बससेवा सुरू झाल्याबद्दल विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.



# न्यू इंटेल कॉम्प्युटर, केज संस्थेला MKCL चा मानाचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ ऑगस्ट**

न्यू इंटेल कॉम्प्युटर, केज ही चडउखढ ची तालुक्यातील सर्वात जुनी आणि दर्जेदार संस्था असून, २०२५ या शैक्षणिक वर्षात चडउखढ आणि 'क्लिक' या दोन्ही कोर्समध्ये मिळून संपूर्ण जिल्ह्यात सर्वाधिक प्रवेश संख्या नोंदवल्याबद्दल या संस्थेला MKCL (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) तर्फे गौरवण्यात आले.




ही गौरवपर पारितोषिक चघउङ च्या विभागीय बैठकीत संस्थेचे प्राचार्य श्री. गणेश सातवधार यांनी स्वीकारले. हे पारितोषिक MKCL चे व्यवस्थापकीय संचालक श्री. समीर पांडे सर आणि श्री. बालकिशन बलदवा सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

न्यू इंटेल कॉम्प्युटर ही संस्था गेल्या २५ वर्षांपासून गुणवत्तापूर्ण संगणक शिक्षण देण्यासाठी ओळखली जाते. या संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवले असून, केज व परिसरात संगणक शिक्षण क्षेत्रात एक विश्वासार्ह नाव निर्माण केले आहे.

# वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान;खा.सोनवणेंनी संसदेत मांडला प्रश्न

## हरीण, रानडुकरांनी नुकसान केल्यास भरपाई का नाही?, शेतकऱ्यांच्या आवाज दिल्लीत पोहचविला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑगस्ट**

बीड जिल्ह्यात हरीण, रानडुक्करे व इतर वन्य प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत आहे. नैसर्गिक आपत्ती सोबतच जंगली प्राणी उपद्रवामुळे शेतीमालाचे नुकसान बीड जिल्ह्यातील कांही भागात मोठ्या प्रमाणात होत असते. ही चिंतेची बाब आहे. हा उपद्रव रोकण्यासाठी उपाय योजना करण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त शेतक-यांना पिकांची नुकसान भरपाई मिळत नाही. इतर राज्यांमधे हत्तीने पिकाचे नुकसान केले तर भरपाई मिळते, पण आमच्या शेतकऱ्यांना हरीण, रानडुक्कर यांनी नुकसान केल्यानंतर नुकसान भरपाई का मिळत नाही?, असा सवाल उपस्थित करत वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच हा उपद्रव रोकण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. जिल्ह्यातील शेतकरीपुत्र म्हणून खा.सोनवणे यांची ओळख असून ते वारंवार शेती प्रश्नावर आवाज उठवित आहेत.

कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे, पंतप्रधान पीक विमा योजनेत नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस संरक्षण मिळते तसेच शेतीला कुंपण घालण्यासाठी राज्य सरकारे उपाययोजना करतात मात्र, जंगली प्राण्यांमुळे होणारे नुकसान हे टाळता येण्यासारखे असल्याने आधी या योजनेत त्याचा समावेश नव्हता. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विविध राज्य सरकारांच्या विनंतीनंतर, राज्य सरकारांना या नुकसानीचा 'ड-ऑन कव्हर' स्वरूपात समावेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत हा पर्याय लागू केलेला नाही. तसेच, केंद्र सरकारकडून 'डेव्हलपमेंट ऑफ वाइल्डलाईफ हॅबिटॅट्स', 'प्रोजेक्ट टायगर' आणि 'प्रोजेक्ट एलिफंट' या योजनांतर्गत राज्यांना आर्थिक मदत दिली जाते. यामध्ये काटेरी तारांचे कुंपण, सोलार ऊर्जेवर चालणारे कुंपण, कॅक्टसची जिवंत फेन्सिंग, भिंती इत्यादींची उभारणी करून पिकांमध्ये जंगली प्राण्यांची घुसखोरी रोखण्याच्या उपायांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यात हरीण, रानडुकरांमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वन्यप्राण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, शिवाय पिक वाचविण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी खा.सोनवणे यांनी केली आहे.

अशा आहेत महत्वाच्या मागण्या

१. महाराष्ट्रात पंतप्रधान पीक विमा योजनेच्या ड-ऑन कव्हरमध्ये हरिण व रानडुकरांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा समावेश करण्यास तात्काळ मान्यता द्यावी.

२. हा पर्याय लागू झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्याबाबत योग्य ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते वेळेत या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

३. तसेच, केंद्र व राज्य योजनांद्वारे उपलब्ध असलेल्या सोलार किंवा तारांचे कुंपण, भिंत बांधकाम इत्यादी प्रतिबंधात्मक उपायांनाही अधिक बळकटी द्यावी.

केंद्रशासनाच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आवश्यक ती आर्थिक सुरक्षा मिळेल आणि शेतीसंबंधी टाळता येणाऱ्या धोका घटकांपासून संरक्षण मिळेल, मात्र महाराष्ट्र राज्यातील सर्वदूर भागामधे रानडुक्कर, हरिणे तसेच इतर जंगली प्राणी याचा शेतास होत असलेल्या उपद्रवामुळे शेतकरी त्रस्त आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेमधे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ड-ऑन कव्हरमधे रानडुक्करे, हरिणे व इतर जंगली प्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीचा समावेश करावा व अशा भागामधे शेतीला कुंपण घालून हा उपद्रव रोकण्यासाठी उपाययोजना करव्यात यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना खा.बजरंग सोनवणे यांनी पत्र देऊन मागणी केली आहे.














































जाहिरात संकलन : मधुकर अनेलवार तालुका प्रतिनीधी, किनवट